नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे     POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### कारखान्याची चौकशी आम्ही लावतो

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्हा दूध संघाच्या कारभारावरून सुरू असलेल्या राजकीय वादात आता पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. 'विठ्ठल' कारखान्यात सुमारे ३५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचा थेट आरोप करत, याप्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे सखोल चौकशीची मागणी करणार असल्याचा इशारा जिल्हा दूधसंघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी दिला. "तुम्ही दूध संघाची चौकशी लावा, आम्ही विठ्ठल कारखान्याची लावतो," असे थेट आव्हान शिंदे यांनी कारखान्याचे अध्यक्ष तथा माढाचे आमदार अभिजीत पाटील यांना दिले. तर दुसरीकडे, "कारखान्याचे सर्व दप्तर नियम आणि कायद्याच्या चौकटीत असून आम्ही कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास व समोरासमोर चर्चेला तयार आहोत," असे प्रत्युत्तर आमदार पाटील यांनी दिले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माढा व पंढरपूर तालुक्यांतील हा राजकीय संघर्ष आता कमालीचा तापला आहे.

### नितीन गडकरींचं विधान चर्चेत

सोलापूर (स. गांवकरी) : भारताच्या ऑटोमोटिव्ह (वाहन) उद्योगात जगात अव्वल बनण्याची क्षमता असून हा उद्योग आर्थिक विकासाचा मुख्य चालक आहे, असं महत्त्वाचं विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. एचटी ऑटो लीडरबोर्ड अवॉर्ड्स २०२६ कार्यकर्माच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. "हा उद्योग अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या उद्योगाला जगात पहिल्या क्रमांकावर नेण्याचे माझे स्वप्न आहे. सध्या पहिल्या क्रमांकावर अमेरिका आणि दुसऱ्या क्रमांकावर चीन आहे. भारत तिसऱ्या स्थानावर आहे", असं गडकरी म्हणाले. भारताच्या ऑटोमोटिव्ह क्षेत्राचे देशाच्या आर्थिक विकासात आणि औद्योगिक परिसंस्थेत केंद्रीय स्थान असल्याचे अधोरेखित करताना, हे क्षेत्र अर्थव्यवस्थेत २२.७५ लाख कोटींचे योगदान देते, असं त्यांनी नमूद केलं. भारताने इथेनॉल-आधारित अर्थव्यवस्था विकसित करण्यात केलेल्या प्रगतीवर प्रकाश टाकत केंद्रीय मंत्री म्हणाले, "इथेनॉल अर्थव्यवस्था आधीच खूप यशस्वी झाली आहे. २०२२ पासून, आपल्याकडे चार कोटी चारचाकी आणि २० कोटी दुचाकी वाहने ई२० पेट्रोलवर चालत आहेत. आम्हाला याबद्दल एकही तक्रार मिळालेली नाही. येथे बसलेल्या बऱ्याच लोकांच्या वाहनांमध्येही ई२० पेट्रोल असेल. काही तक्रार आहे का? कोणतीही तक्रार नाही", असं ते म्हणाले.

### स्मित मच्छार यांचा जुना Video व्हायरल

सोलापूर (स. गांवकरी) : दुबईमधून तेल अवीवला जाणाऱ्या 'फ्लायदुबई' या विमान कंपनीच्या एका विमानात धक्कादायक घटना घडली आहे. विमानामध्ये वैमानिकावर चाकूने हल्ला करण्यात आला. त्यामुळे विमानात एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर हे विमान हायजॅक झाल्याची भीती आधी व्यक्त करण्यात आली होती. मात्र, या विमानातील दोन्ही वैमानिकांमध्ये झटापट झाल्याची माहिती त्यानंतर समोर आली. या घटनेनंतर हे विमान सौदी अरेबियामध्ये उतरवण्यात आलं. 'फ्लायदुबई' या विमान कंपनीच्या विमानामध्ये बुधवारी वैमानिकावर चाकूने हल्ला करण्यात आल्याच्या घटनेत जखमी झालेले वैमानिक हे भारतीय नागरिक असून त्यांचं नाव स्मित मच्छार असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर 'बोईंग ७३७ मॅक्स ८' या विमानाचं उत्तर-पश्चिम सौदी अरेबियातील ताबूक विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं. या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# गुवाहाटीत धावांचा महापूर



- 4 शतके, एक द्विशतक अन् 811 धावा!
- भारत आणि वेस्ट इंडिजने ODI क्रिकेटचा इतिहास-भूगोल बदलून टाकला

मुंबई : (स. गांवकरी)

गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात झालेला दुसरा एकदिवसीय सामना अक्षरशः धावांच्या महापूराचा साक्षीदार ठरला. दोन्ही संघांच्या फलंदाजांनी गोलंदाजांची अक्षरशः धुलाई करत तब्बल 811 धावा केल्या. या सामन्यात एक-दोन नव्हे, तर चार शतके आणि एका द्विशतक पाहायला मिळालं. वेस्ट इंडिजकडून शाई होप, जॉन कॅम्पबेल आणि अमीर जांगू यांनी शतके झळकावली, तर भारताकडून रोहित शर्मानेे शतक ठोकत दमदार कमबॅक केले आणि कर्णधार शुभमन गिलने द्विशतक झळकावत इतिहास रचला.

शुभमन गिलचे द्विशतक आणि रोहित शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजवर 8 गडी राखून विजय मिळवला. गुवाहाटी येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात, प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने 50 षटकांत 7 गडी गमावून 405 धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना, भारतीय संघाने केवळ 43.3 षटकांत 406 धावा करून विजय मिळवला. या फॉरमॅटमधील भारताचा हा सर्वात मोठा पाठलाग होता. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात 400 पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार करण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. यापूर्वी, 2006 मध्ये दक्षिण आफ्रिकेने एकदिवसीय सामन्यात 438 धावांचा पाठलाग करून विजय मिळवला होता.भारताविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजने धावांचा डोंगर उभा केला आहे. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, जॉन कॅम्बेल, शाई होप आणि अमीर जांगू यांच्या शतकी खेळीच्या जोरावर वेस्ट इंडिजने 50 षटकांत 7 गडी गमावून 405 धावा केल्या. ही वेस्ट इंडिजची एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. विशेष म्हणजे, भारताविरुद्ध कॅरिबियन संघाने वनडेत पहिल्यांदाच 400 धावांचा टप्पा ओलांडला आहे. अमीर जांगूने सर्वाधिक 144 धावांची खेळी केली.

कॅम्पबेलने कर्णधार शाई होपसोबत दुसऱ्या विकेटसाठी 110 धावांची भागीदारी केली. त्यानंतर जांगू आणि होप यांनी तिसऱ्या विकेटसाठी तब्बल 182 धावा जोडल्या. या भागीदारीमुळे वेस्ट इंडिजला मोठी धावसंख्या उभारण्याची संधी मिळाली. जांगूने 114 धावा केल्या, तर शाई होपने 104 आणि जॉन कॅम्पबेलने 102 धावांची शतकी खेळी केली. रॉस्टन चेसने नाबाद 29 धावा करत संघाला 400 धावांचा टप्पा पार करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. वेस्ट इंडिजकडून केसी कार्टीने 9, अल्झारी जोसेफने 8 आणि कीमो पॉलने 3 धावा केल्या. शमर जोसेफ 14 धावांवर नाबाद राहिला. भारताकडून गुरनूर ब्रार, कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या, तर प्रसिद्ध कृष्णाला एक विकेट मिळाली.

शुभमन गिलने भारताला धावांचा पाठलाग करताना नेतृत्व केले आणि 133 चेंडूंमध्ये 26 चौकार व 8 षटकारांसह नाबाद 223 धावा केल्या. गिल एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद द्विशतक झळकावणारा फलंदाज ठरला. त्याच्यासोबत सलामीला आलेल्या रोहित शर्मानेे 10 चौकार आणि 6 षटकारांसह 75 चेंडूंमध्ये 101 धावा केल्या.

## एमपीएससीच्या परीक्षांबाबत ६ मोठे निर्णय घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन



### २ ऑक्टोबरचं MPSC विद्यार्थ्यांचं आंदोलन स्थगित

मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या परीक्षांच्या विविध मुद्यांवरून विद्यार्थी राज्यभर आंदोलन करत आहेत. आता पुन्हा एकदा विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, त्याआधी म्हणजे आज (३० सप्टेंबर) एमपीएससी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणून घेतल्या आणि त्यावर सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्यात आल्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना दिलं आहे. एमपीएससी परीक्षा ऑफलाईनच होईल आणि आजवरचे सर्व रेकॉर्ड तुटतील एवढ्या जागा भरण्यात येतील, असं ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. त्यानंतर अखेर पुण्यात २ ऑक्टोबर रोजी होणारं विद्यार्थ्यांचं आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. या संदर्भातील माहिती सीएमओ कार्यालयाने एक्सवर पोस्ट शेअर करत दिली आहे. एमपीएससी अध्यक्ष हे संवैधानिक पद आहे. त्यांना हटवण्याचा अधिकार राज्य सरकार, राज्यपाल यांना नाही. राष्ट्रपतींना सुप्रीम कोर्टाच्या सल्ल्याने तो अधिकार आहे. एमपीएससीचे पूर्व आणि विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्य यांच्याबाबत संविधानाच्या कलम ३१७ प्रमाणे हटवण्याची कारवाई व्हावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी होती. त्यानुषंगाने ३ महिन्यांत न्यायालयीन चौकशी करून त्या निष्कर्षाच्या आधारावर पुढची कारवाई करण्यात येईल. आजवरचे सर्व रेकॉर्ड तुटतील, इतक्या जागा भरण्यात येतील. राज्य सरकारमध्ये ३० ते ४० हजार पदोन्नती झालेल्या नव्हत्या. भरती नियमात १९६० पासून नवीन सुधारणा झालेल्या नव्हत्या. त्यामुळे विभागात साधारणतः ३०-४० टक्के जागा भरण्याची परवानगी दिली जायची.

## माजी आयएएस अधिकाऱ्याची भोपाळमध्ये गळा चिरून हत्या

### बेडरूममध्ये रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह

भोपाळ : (स. गांवकरी)

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये निवृत्त आयएएस अधिकारी राकेश अग्रवाल यांची गळा चिरून हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. सूरजनगरमधील पनघट कॉलनीच्या मागील भागात असलेल्या त्यांच्या घरातील बेडरूममध्ये बुधवारी पहाटे त्यांचा मृतदेह आढळून आला. रतिबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, हत्या रात्री २ ते ३ वाजण्याच्या दरम्यान झाल्याचा संशय आहे. या प्रकरणात वरुण कुमार नावाचा केअरटेकर पोलिसांच्या तपासाच्या केंद्रस्थानी आहे. त्याला एका एजन्सीमार्फत अवघ्या तीन दिवसांपूर्वी २४ तासांसाठी केअरटेकर-कम-मेल नर्स म्हणून कामावर ठेवण्यात आले होते. तो पंजाबचा रहिवासी असल्याचे



सांगण्यात येत असून, घटनेनंतर तो बेपत्ता आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक पथकाने घराची तपासणी करून विविध पुरावे गोळा केले आहेत. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, हत्येच्या वेळी घरात कोण उपस्थित होते आणि संशयित घटनास्थळावरून कसा बाहेर पडला, याचा शोध घेतला जात आहे.

## तरुणांच्या संशोधनातून महाराष्ट्र जगाचे 'इनोव्हेशन हब' होईल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

मुंबई : (स. गांवकरी)

नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, संशोधन आणि तरुणांच्या नवकल्पनांच्या बळावर राज्याला भविष्यात जगाचे 'इनोव्हेशन हब' बनविण्याचे सामर्थ्य आहे. देशातील एकूण स्टार्टअपपैकी सुमारे १८ टक्के स्टार्टअप राज्यात सुरु होत आहेत. राज्यात ३० हजारांहून अधिक स्टार्टअप आहेत. या परिसंस्थांना संशोधन, उद्योग आणि बाजारपेठेची जोड देऊन नवकल्पनांचे प्रत्यक्ष परिणाम दिसतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. एनसीपीएच्या जमशेद भाभा सभागृहात गेट्स फाउंडेशन आणि समग्र संस्थेच्या समन्वयाने आयोजित 'द गव्हर्नन्स चॅलेंज'च्या चौथ्या आवृत्तीतील विजेत्यांना फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, 'मित्रा'चे सदस्य दीपक करंजीकर उपस्थित होते. राज्याला २०३५ पर्यंत संशोधनाच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी नवकल्पनांचा वापर हा यंदाच्या स्पर्धेचा विषय होता. ही केवळ स्पर्धा नसून प्रशासनाच्या भविष्यातील रचनेला आकार देणाऱ्या प्रतिभा आणि कल्पना शोधण्याचा उपक्रम आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, डिजिटल प्रशासन, शहरीकरण, कृषी, आरोग्य, शिक्षण, हवामान बदल आणि नवोन्मेष या क्षेत्रांत तरुणांचा दृष्टिकोन प्रशासनात आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. राज्यातील नागपूर, नाशिक, कोल्हापूर, नांदेड, अमरावतीसह प्रत्येक भागातील युवा संशोधकांना मार्गदर्शन, तंत्रज्ञान, इन्क्युबेशन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. हॅकेथॉन किंवा स्पर्धा केवळ प्रमाणपत्र देऊन संपता कामा नये, त्यातून पुढे आलेल्या



कल्पनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्यात ३०० एकर क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'इनोव्हेशन सिटी' उभारण्याचे नियोजन आहे. राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दोन लाख युवक व व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एआय इन्क्युबेटर्स स्थापन करण्याची तयारी आहे. शासकीय डेटाचाही युवा नवोन्मेषकांना संशोधनासाठी उपयोग करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहा संघांनी आरोग्य, कृषी, शिक्षण, वित्त, प्रशासनातील नवोन्मेष आणि शहरी विकास या विषयांवर सादरीकरण केले. मास्टर्स युनियन स्कूल ऑफ बिझनेसच्या अंकिता शिर्के, सिद्धार्थ राजपाल आणि गुरुप्रसाद शेट्टी यांच्या संघाने शहरी विकासावरील नवकल्पनेसाठी पाच लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले.

# मुलाने देशासाठी जिंकली दोन सुवर्णपदके

### साताऱ्याच्या साहिलची प्रेरणादायी कहाणी

सातारा : (स. गांवकरी)

घरची बेताची आर्थिक स्थिती, वडलांची नोकरी गेलेली, बहिणीची जबाबदारी अशा पार्श्वभूमीवर त्याने तिरंदाजीचे स्वप्न उराशी बाळगले. अखंड सराव, मेहनत घेण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर त्याच्या या जिद्दीपुढे आर्थिक पाठबळाचे संकट उभे ठाकले. अशावेळी मुलाचे स्वप्न साकार करण्यासाठी अखेर त्याच्या आईने स्वत:चे दागिने विकले आणि तिरंदाजीसाठी आवश्यक सराव-साहित्य खरेदी केले. या साऱ्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या या 'अर्जुना'ने जपानमध्ये सुरू असलेल्या २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला एक नाही तर तब्बल दोन सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. ही गौरवगाथा आहे सातारा जिल्ह्यातील करंडी गावातील साहिल जाधव याची. त्याच्या या यशाचे आज देशभर कौतुक होत आहे. साहिल हा सातारा जिल्ह्यातील करंडी नावाच्या छोट्याशा गावातील खेळाडू. त्याला सुरुवातीपासूनच तिरंदाजी खेळाची आवड होती. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्याच्या या खेळाला उत्तेजन मिळाले. त्याचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील अनंत इंग्लिश स्कूलमध्ये झाले. तर साताऱ्यातीलच वाय. सी. कॉलेजमधून एम.एस्सी. पूर्ण करत त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. शिक्षणाच्या या टप्प्यावरच साहिल तिरंदाजीकडे वळला. मात्र घरच्या सामान्य परिस्थितीमुळे या खेळात पुढे प्रवास करणे त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरले होते.

एका शेतकरी कुटुंबातून आलेल्या साहिलचे वडील राजेश जाधव हे एका खासगी कंपनीत नोकरी करत होते. मात्र साहिलचे शिक्षण सुरू असतानाच त्यांची ही नोकरी गेली. आई सीमा जाधव शिक्षिका म्हणून नोकरी करतात. त्यांच्या उत्पन्नावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे. साहिलसोबतच एक बहिण सानिका हिचेही शिक्षण सुरू. अशा परिस्थितीत तिरंदाजीसारख्या महागड्या खेळाचे स्वप्न पाहणेही साहिलसाठी अवघड होते. या खेळासाठी लागणारा सराव, मार्गदर्शन, महागडी साधने यासाठी खूप मोठा खर्च करावा लागणार होता. मात्र मुलाची आवड आणि जिद्द पाहून



या कुटुंबाने आर्थिक चटके सहन करत साहिलच्या या खेळाला पाठिंबा दिला. प्रसंगी त्याच्या आईने स्वत:चे दागिने विकले मात्र त्याच्या या खेळाचा प्रवास निरंतर सुरू राहील याची काळजी घेतली.

कुटुंबाच्या या पाठिंब्याच्या जोरावर साहिलने देखील अपार मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिरंदाजीतील हा प्रवास सतत यशाची कमान उंचावत सुरू केला. २०१६ मध्ये साहिलने व्यावसायिक स्पर्धेसाठी सराव सुरू केला. 'दृष्टी आर्चरी अकादमी'तून त्याने प्रशिक्षणाला सुरुवात केली. मात्र, त्याचा हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. पहिले राष्ट्रीय पदक मिळवण्यासाठी त्याला तब्बल सात वर्षे वाट पाहावी लागली. अनेकदा अगदी थोड्या फरकाने त्याचे हे पदक हुकले, पण त्याने हार मानली नाही. अखेर २०२४ मध्ये वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत त्याने पहिले राष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर २०२५ मध्ये 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स'मध्ये वैयक्तिक सुवर्णपदक जिंकून त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर छाप पाडली. २०२६ च्या शांघाय 'आर्चरी वर्ल्ड कप'मध्ये पुरुषांच्या 'कंपाउंड इंडिव्हिज्युअल' प्रकारात कांस्यपदक मिळवून त्याने आपल्या यशाची मालिका कायम ठेवली. यानंतर त्याने यंदा आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पाऊल ठेवले आणि गेल्या अनेक वर्षांच्या अपार मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर एक नाहीतर तब्बल दोन सुवर्णपदकांची कमाई केली.

## मनधरणीसाठी थेट अमेरिकेत पोहोचला ३१ वर्षांचा मुंबईकर तरुण

मुंबई : (स. गांवकरी)

एका अल्पवयीन मुलीने संपर्क तोडल्यानंतर भारतातून थेट अमेरिकेला प्रवास करणाऱ्या मुंबईतील एका व्यक्तीला टेनेसीमधील डेव्हिडसन काउंटीत अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली अनेक गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. २४ सप्टेंबर रोजी 'मेडलँड्स कम्युनिटी' परिसरात एक प्रौढ व्यक्ती अल्पवयीन मुलीचा पाठलाग करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर ३१ वर्षीय प्रीत पंकज जैन याला ताब्यात घेण्यात आलं. एका उबर ड्रायव्हरने पोलिसांना या संशयित पाठलागाबाबत सावध केलं आणि तिथूनच या प्रकरणाचा तपास सुरू झाला. चौकशीदरम्यान जैनने पोलिसांना सांगितलं की, तो ऑनलाइन डेटिंगद्वारे ओळख झालेल्या एका मुलीला भेटायला आला होता आणि तिला भेटवस्तू देण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, तपासकर्त्यांनी शोधून काढलं की ती मुलगी अल्पवयीन होती. यानंतर डेव्हिडसन काउंटी शेरीफ ऑफिसच्या गुन्हे अन्वेषण विभागाने तपासाचा भाग



म्हणून जैनच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांची न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) तपासणी केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फॉरेन्सिक तपासणीतून असं समोर आलं आहे की, जैनने दीर्घकाळ त्या मुलीसोबत ऑनलाइन संबंध ठेवताना आपले खरे वय आणि ओळख लपवून ठेवली होती. जेव्हा त्या मुलीला जैनची खरी ओळख समजली, तेव्हा तिने संवाद थांबवला आणि त्याला ऑनलाइन ब्लॉक केले; त्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. पोलिसांनी असा आरोप केला आहे की, जैनने त्या मुलीशी पुन्हा संपर्क साधण्याच्या उद्देशाने मुंबईहून थेट अमेरिकेत प्रवास केला. या आरोपांच्या आधारे त्याच्यावर अत्यंत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २५ सप्टेंबर रोजी जैनला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले आणि त्यानंतर डेव्हिडसन काउंटी जिल्हा न्यायालयात सादर केलं गेलं.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी — संपादकीय —



**डॉ. विश्वासराव आरोटे**
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# सिग्नल पाळणारेच खरे देशभक्त!

**देशभक्ती म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर देशासाठी प्राण देणारे सैनिक, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि देशासाठी मोठमोठी कामे करणाऱ्या व्यक्ती उभ्या राहतात. मात्र देशभक्ती केवळ मोठमोठ्या घोषणा देण्यात किंवा राष्ट्रीय सणांच्या दिवशी देशप्रेम व्यक्त करण्यात नसते. आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्यातही खरी देशभक्ती दडलेली असते. रस्त्यावर वाहतुकीचा सिग्नल लाल असताना वाहन थांबविणारा नागरिक हा देखील देशाच्या शिस्तीचा आणि कायद्याचा सन्मान करणारा खरा देशभक्त आहे.**

आज शहरांमधील वाहतूक ही गंभीर समस्या बनली आहे. वाढती वाहनसंख्या, अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी, अपघात आणि नियमभंग यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि मानसिक शांतता यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. या परिस्थितीत वाहतूक नियमांचे पालन करणे ही केवळ पोलिसांची किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे.

लाल सिग्नल लागलेला असताना घाईघाईने पुढे जाणे, सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, पादचारी मार्गावर वाहन उभे करणे, हेल्मेट किंवा आसनपट्टा न वापरणे, वाहन चालवताना भ्रमणध्वनीचा वापर करणे असे प्रकार आपण रोज पाहतो. अनेकदा काही जण सिग्नल तोडताना स्वतःला हुशार समजतात. मात्र काही सेकंद वाचविण्याच्या नादात एखाद्याचे आयुष्य धोक्यात येऊ शकते, याचा विचार केला जात नाही.

सिग्नलवर थांबणे म्हणजे केवळ पोलिसांच्या दंडापासून स्वतःला वाचविणे नव्हे. सिग्नल पाळणे म्हणजे समोरच्या व्यक्तीच्या जीवाचा आदर करणे. आपल्या एका चुकीच्या निर्णयामुळे एखाद्या कुटुंबाचा आधार हिरावला जाऊ शकतो. त्यामुळे वाहतुकीचा नियम हा केवळ कागदावरील कायदा नसून समाजाच्या सुरक्षिततेची व्यवस्था आहे.



देशाची प्रगती केवळ मोठ्या रस्त्यांनी, उंच इमारतींनी किंवा आधुनिक तंत्रज्ञानाने होत नाही. देशाची खरी प्रगती नागरिकांच्या शिस्तीतून दिसून येते. ज्या समाजातील नागरिक वाहतूक नियम, सार्वजनिक स्वच्छता, करप्रणाली, कायदे आणि सार्वजनिक मालमत्तेचा आदर करतात, तो समाज अधिक जबाबदार आणि सक्षम बनतो.

आपण सैनिकांच्या देशसेवेचा अभिमान बाळगतो. सीमारेषेवर सैनिक आपले कर्तव्य बजावत असताना शहरातील नागरिकांनीही आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे गरजेचे आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करणारा सैनिक देशभक्त आहेच; पण शहराच्या चौकात लाल दिवा लागल्यावर वाहन थांबविणारा नागरिकही देशाच्या कायद्याचा आणि शिस्तीचा सन्मान करीत असतो. हीच नागरिकत्वाची खरी भावना आहे.

विशेषतः पालकांनी आपल्या मुलांसमोर वाहतुकीचे नियम पाळण्याचा आदर्श ठेवला पाहिजे. मुलांना शाळेत वाहतूक नियम शिकवून उपयोग नाही, जर त्याच मुलांनी आपल्या पालकांना रोज सिग्नल तोडताना पाहिले. पुढची पिढी काय शिकणार, हे आपल्या कृतीवर अवलंबून आहे.

प्रशासनानेही केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे. स्पष्ट सिग्नल व्यवस्था, योग्य रस्तेचिन्हे, पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग, वाहतूक पोलिसांची प्रभावी उपस्थिती आणि नियमांचे सातत्याने पालन यामुळे परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. मात्र प्रशासन कितीही सक्षम असले तरी नागरिकांनी नियम पाळले नाहीत तर वाहतूक समस्या पूर्णपणे सुटणार नाही.

म्हणून देशभक्तीची व्याख्या आपण थोडी व्यापक करण्याची गरज आहे. देशासाठी घोषणाबाजी करण्यापेक्षा देशाच्या कायद्याचा आदर करणे अधिक महत्त्वाचे आहे. राष्ट्रध्वजाला सलाम करण्याबरोबरच रस्त्यावरील वाहतूक नियमांनाही सलाम करायला शिकले पाहिजे. लाल दिवा दिसला की थांबणे, हिरवा दिवा लागला की पुढे जाणे आणि प्रत्येकाच्या जीवाचा आदर करणे हीच जबाबदार नागरिकाची ओळख आहे.

कारण देशभक्ती केवळ सीमेवर सिद्ध होत नाही; ती रोजच्या रस्त्यावरही सिद्ध होते. सिग्नल पाळा, जीव वाचवा, शिस्त जपा कारण सिग्नल पाळणारेच खरे देशभक्त!

# थोडक्यात पण महत्वाचे




## सभासदांना १०% लाभांश देत ग्रामसेवा पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : धनगरवाडी ता:-जुन्नर येथील ग्रामसेवा नागरी सह. पतसंस्था मर्यादित धनगरवाडी ची वार्षिक सर्वसाधारण सभा येथील हरिश्चंद्र गेणुजी शेळके सभागृहात सभासदांना १०% लाभांश देऊन खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेचे प्रास्ताविक संस्थापक बजरंगशेठ रामदास शेळके यांनी केले.सूत्रसंचालन सचिव विलास गोविंद शेळके यांनी केले,तर अहवाल वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबरा व शिवराम सोलाट यांनी केले. आभार अध्यक्ष इंद्रजित अरुण शेळके यांनी मानले.यावेळी सभासदांनी मांडलेल्या सूचनां चे निरसन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन गुणवंतविद्यार्थ्यां चा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर विजय नाना शेळके,भरत शेळके, बन्सी कराळे,कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका प्रियांका शेळके,सरपंच महेश शेळके आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये संस्थापक बजरंगशेठ रामदास शेळके,अध्यक्ष इंद्रजित अरुण शेळके, उपाध्यक्ष मारुती सिताराम शेळके,सचिव विलास गोविंद शेळके, संचालक - प्रकाश आत्माराम शेळके, यशवंत अंबू शेळके, एकनाथ गणपत शेळके, चंद्रकांत भाऊजी शेळके, गोकुळदास माणिक शेळके, आशिष बजरंग शेळके, प्रियांका महेश शेळके, सविता चंद्रकांत शेळके, पंढरीनाथ हिरामण साळुंके, तज्ञ संचालक - मारुती भाऊ शिंगोटे, जगन्नाथ दादाभाऊ शेळके, मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबराव शिवराम सोलाट, लेखापाल मनोरमा आशुतोष शेळके, कर्ज वसुली अधिकारी शुभम उल्हास शिंदे, लेखनिक माधुरी जालींदर शिंदे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्नरच्या पश्चिम घाटात वनस्पतीची दुर्मीळ प्रजाती सापडली



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पश्चिम घाट परिसरात वांगी कुळातील वनस्पतीशी साधर्म्य असलेली,आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेली एक वनस्पती संशोधकांना आढळून आली आहे.शास्त्रोक्त अभ्यासानंतर ही वनस्पती विज्ञानासाठी नवीन असल्याचे स्पष्ट झाले असून,भारत देशाच्या नावाव रून तिचे 'भारती'असे नाम करण करण्यात आले आहे. अभ्यासक आणि संशोधक डॉ.सविता रहांगडाले आणि डॉ. संजयकुमार रहांगडाले यांनी या वनस्पतीचा शोध लावला.'एस्ट्रिपोमोईया भारती' (Astripomoea bharatii) असे तिचे शास्त्रीय नाव देण्यात आले आहे.या वनस्पतीचे शास्त्रीय विवेचन २०२६ मध्ये 'फायटोटेक्झा' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झाले आहे. रहांगडाले दांपत्य गेल्या २८ वर्षांपासून जुन्नर तालुक्यातील पश्चिम घाटातील वनसंपदेचा अभ्यास करत आहे.पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्या लयातील विद्यार्थी सलमान शेख यांच्या सहकार्याने जुन्नर वनविभागातील विविध भागांतून या वनस्पतीचे नमुने गोळा करण्यात आले.त्यानंतर प्रयोगशाळेत तिची फुले,फळे परागकण आणि बिया यांचा सखोल अभ्यास करण्यात आला.जगभरातील हर्बेरियम मध्ये जतन केलेल्या वनस्पती नमुन्यांशी तुलना केल्यानंतर ही प्रजाती विज्ञानासाठी पूर्णपणे नवीन असल्याचे निष्पन्न झाले.



## गौणखनिज उत्खननातील स्फोटांमुळे नागरिकांमध्ये भीती

नंदुरबार (स. गांवकरी) : शहादा तालुक्यातील सारंगखेडा परिसरात गौणखनिज उत्खननासाठी करण्यात येणाऱ्या स्फोटांमुळे नागरी वस्तीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणावर करण्यात येणाऱ्या स्फोटांमुळे परिसरातील जमीन हादरत असून, घरांना हादरे बसत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे संबंधित गौणखनिज उत्खनन व्यावसायिकांना शासनाच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार स्फोट करण्याचे आदेश द्यावेत, तसेच नियमबाह्य स्फोट तातडीने बंद करावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे. सारंगखेडा येथील न्यू रावण स्टोन या स्टोन क्रशर मशीन व्यवसायाच्या माध्यमातून गौणखनिज उत्खननासाठी वेळोवेळी मोठ्या प्रमाणावर स्फोट घडवून आणले जात असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच रात्रीच्या वेळीही स्फोट घडवून आणले जात असल्याने त्याचा परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. गौणखनिज उत्खननाच्या ठिकाणापासून काही अंतरावर कंकुबाई रोडलगतची मोठी नागरी वसाहत असलेली रावलनगर (बेतागवाडी) परिसरात आहे. स्फोट होताच या परिसरातील घरांना मोठ्या प्रमाणात हादरे बसत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काही वेळा हे हादरे भूकंपासारखे जाणवत असल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# रावेर भूमी अभिलेख कार्यालयात प्रशासकीय कारवाईचा दणका

रावेर : (स. गांवकरी)



■ आमदार अमोलभाऊ जावळे यांच्या पाठपुराव्याला यश; दोन अधिकारी निलंबित

रावेर तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील कामकाजाबाबत नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत असलेल्या तक्रारींची अखेर प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. मोजणी प्रकरणांमध्ये होणारा विलंब, कामकाजातील अनियमितता आणि कर्तव्यातील कसूर या बाबींच्या अनुषंगाने कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दखलीनंतर तसेच आमदार अमोलभाऊ जावळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कारवाई झाल्याचे सांगण्यात येत आहे. भूमी अभिलेख कार्यालयातील विविध मोजणी प्रकरणे वेळेत निकाली निघत नसल्याच्या, तसेच शासकीय कामांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. कामकाजातील अनियमितता आणि नागरिकांच्या अडचणींबाबतही तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत आमदार अमोलभाऊ जावळे यांनी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांची कामे वेळेत व्हावीत, शासकीय यंत्रणेत पारदर्शकता आणि गतिमानता यावी, तसेच कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. या प्रकरणाची विभागीय चौकशी करण्यात आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांन्वये रावेर भूमी अभिलेख कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश यांच्याकडून जारी करण्यात आल्याची माहिती आहे.

# उत्तराखंडमधील शिक्षकांना मिळणार कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण

### एससीईआरटी उत्तराखंड आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशनमध्ये सामंजस्य करार

■ राज्यभरातील शिक्षकांची कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता व कौशल्यवृद्धीवर भर

पुणे : (स. गांवकरी)



उत्तराखंड राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांनी राज्यातील शिक्षकांची कृत्रिम बुद्धिमत्ता विषयातील साक्षरता आणि कौशल्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीमुळे राज्यातील शिक्षकांना आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि साधने उपलब्ध होणार आहेत.

या कराराअंतर्गत एससीईआरटी उत्तराखंडचा माहिती-तंत्रज्ञान विभाग आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन संयुक्तपणे शिक्षकांसाठी शैक्षणिक सामग्री, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि तांत्रिक सहाय्य विकसित करणार आहेत. विकसित करण्यात येणारे अभ्यासक्रम दीक्षा, यूके ई-सृजन आणि मिशन कर्मयोगी यांसारख्या डिजिटल व्यासपीठांवर उपलब्ध करून देण्याची योजना आहे. कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने उत्तराखंडमधील शिक्षकांसाठी 'एआय कोर्स फॉर एज्युकेटर्स' हा अभ्यासक्रम स्थानिक गरजांनुसार विकसित करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. या माध्यमातून शिक्षकांना अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थपूर्ण वापर करण्याबरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या शिकण्याच्या विविध गरजांनुसार अध्यापन करण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमामुळे धड्यांचे नियोजन, मूल्यांकन तसेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी शिक्षकांचा आत्मविश्वास आणि क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच भविष्यातील अभ्यासक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या डिजिटल अध्यापन पद्धतींचा समावेश करण्यावरही भर दिला जाणार आहे.

एससीईआरटीच्या संचालक (अकादमिक) बंदना गर्ब्याल यांनी या भागीदारीचे स्वागत करताना सांगितले की, उत्तराखंडमधील दुर्गम जिल्ह्यांतील शिक्षकांपर्यंतही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दर्जेदार शिक्षण पोहोचविण्यास या भागीदारीची मदत होईल. अधिक प्रभावी अध्यापन, विद्यार्थ्यांमधील नवोन्मेष आणि भविष्यासाठी सज्ज वर्गखोल्या निर्माण करण्याच्या दिशेने हे सहकार्य महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जयश्री रमेश यांनी सांगितले की, प्रत्येक शिक्षकाला भविष्यासाठी सज्ज साधने मिळणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला भविष्यासाठी सज्ज शिक्षक मिळणे आवश्यक आहे. एससीईआरटी उत्तराखंडसोबतच्या या सहकार्यामुळे त्यादृष्टीने पुढील कामाला सुरुवात होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एससीईआरटीमहाराष्ट्राच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेला कोटक एज्युकेशन फाउंडेशनचा मराठी भाषेतील 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' हा अभ्यासक्रम सध्या दीक्षा व्यासपीठावर उपलब्ध आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील ७.५ लाखांहून अधिक शिक्षकांपर्यंत पोहोच साधण्यात आली आहे. महाराष्ट्रातील या राज्यस्तरीय उपक्रमाच्या अनुभवाचा उपयोग उत्तराखंडमधील शिक्षकांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण पोहोचविण्यासाठी केला जाणार आहे. 'एआय कोर्स फॉर एज्युकेटर्स' हा शिक्षकांसाठी विकसित करण्यात आलेला स्व-अध्ययनावर आधारित तीन स्तरांचा कार्यक्रम आहे. मूलभूत, मध्यम आणि प्रगत अशा तीन स्तरांमध्ये अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

# २०० रुपयांसाठी चिमुकलीची दोरीवर जीवघेणी कसरत

### डिजिटल युगातील विदारक वास्तव

आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)



एकीकडे आपण डिजिटल इंडिया, मेक इन इंडियाच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे आजही एका चिमुकलीला केवळ २०० रुपयांसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून दोरीवर चालावे लागत असल्याचे हृदयद्रावक चित्र आज बेल्हे बाजारपेठेत पाहायला मिळाले. पोटाची खळगी भरण्यासाठी सुरू असलेला हा थरार पाहून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला.

बेल्हे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज दुपारच्या सुमारास एक कुटुंब आले. रस्त्याच्या दोन बाजूला दोन बांबू रोवून त्यावर एक दोरखंड बांधण्यात आला. हातात तोल सावरण्यासाठी एक मोठी बांबूची काठी, उघड्या पायाने आणि कोणत्याही सुरक्षा साधनाशिवाय सुमारे १२ ते १३ वर्षांची चिमुकली त्या दोरीवर चढली. खाली तिचे आई-वडील जुन्या स्पीकरवर चित्रपटाची गाणी लावून जमलेल्या लोकांकडे हात पसरत होते. दोरीवरची तिची प्रत्येक पावलागणिक जमावाच्या काळजात धस्स होत होते. १० मिनिटांच्या या खेळानंतर लोकांनी दिलेल्या १०-२० रुपयांच्या नोटा गोळा करून ते कुटुंब पुढच्या चौकाकडे निघून गेले.

माहिती घेतली असता हे कुटुंब डोंबारी समाजाचे असल्याचे समजले. डोंबारी समाजाचा हा पारंपरिक खेळ आहे. पूर्वी हा खेळ मनोरंजन म्हणून पाहिला जायचा, मात्र आता महागाई आणि रोजगाराअभावी हाच खेळ त्यांच्या जगण्याचे साधन बनला आहे. "आम्हाला दुसरे कोणतेही काम येत नाही. गावोगाव फिरून खेळ दाखवायचा, लोकांनी दिले त्यावर लेकरं जगवायची. दिवसभर फिरलो तरी २०० ते ३०० रुपयांपेक्षा जास्त मिळत नाहीत. त्यातच सगळं भागवावं लागतं," अशी व्यथा त्या चिमुकलीच्या वडिलांनी बोलून दाखवली. सर्वात गंभीर बाब म्हणजे ज्या वयात हातात पुस्तक-पाटी हवी, त्या वयात तिच्या हातात बांबूची काठी आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे. सरकार भटक्या-विमुक्त समाजासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती, आश्रमशाळा अशा अनेक योजना राबवते. मात्र या योजना प्रत्यक्षात या कुटुंबांपर्यंत पोहोचतच नाहीत, हे आजच्या घटनेने पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रशासनाने अशा कुटुंबांचे सर्वेक्षण करून त्यांना स्थिर रोजगार, घरकुल आणि त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. अन्यथा या चिमुकलीसारख्या अनेक मुलींचे बालपण असेच दोरीवरच संपून जाईल, असा संतप्त सवाल बेल्हेकर नागरिकांमधून उपस्थित होत आहे.



## समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये आविष्कार २०२६ उत्साहात संपन्न

आळेफाटा, ता. जुन्नर: (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे 'आविष्कार २०२६' अंतर्गत संस्थास्तरीय फेरी उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, नवकल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत सहा विविध विषयशाखांमध्ये एकूण ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचा शुभारंभ सरस्वती पूजनाने झाला. समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस संचालक प्रा. राजीव सावंत यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी संशोधन व नवोपक्रमाकडे केवळ स्पर्धेच्या दृष्टिकोनातून न पाहता समाजोपयोगी आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याचा प्रयत्न करावा, असे मार्गदर्शन केले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध संशोधन संकल्पना, प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पना परीक्षकांसमोर प्रभावीपणे सादर केल्या. प्रकल्पांचे मूल्यमापन नाविन्यता, संशोधनाची उपयुक्तता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सादरीकरण कौशल्य आणि भविष्यातील उपयोगिता या निकषांच्या आधारे करण्यात आले.

# सीएसआर फंडातून शाळेचा कायापालट

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)




ओतूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र.२ ( मुलींची शाळा)या शाळेला " हिसोआ इलेक्ट्रॉनिक प्रा. लि.- विवो पुणे कंपनीच्या सीएसआर (सामाजिक दायित्व) उपक्रमांतर्गत विविध सुविधा उपलब्ध करून देण्या त आल्या आहेत.कंपनीच्या सीएसआर फंडातून शाळेच्या टेरेसचे प्रशस्तिकरण,विद्यार्थ्यां साठी सुसज्ज डायनिंग हॉल, आधुनिक हँडवॉश स्टेशन व संपूर्ण शालेय इमारतीचे आकर्षक रंगकाम करण्यात आले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांना अपुऱ्या जागेत मध्यान्ह भोजन करावे लागत होते. आता नवीन डायनिंग हॉलमुळे विद्यार्थी एकत्र बसून स्वच्छ शिस्तबद्ध पद्धतीने भोजन करू शकती ल तसेच हँडवॉश स्टेशनमुळे हात धुण्याची सवय स्वच्छतेचे संस्कार रुजणार आहेत. शाळेच्या रंगरंगोटीमुळे शाळा अधिक प्रसन्न व बालस्नेही झाली आहे.या कामाचे उद्‌घाटन कंपनीचे " हिसोआ इलेक्ट्रॉनिक प्रा.लि.- विवो पुणे कंपनीचे HR हेड सौम्य बक्षी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विवो कंपनीचे प्रतिनिधी श्री.रोहित वाकळे असिस्टंट मॅनेजर एच आर सी एस आर लीड, जिल्हा परिषद सदस्य छायाताई तांबे,पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.वैशाली तांबे व सर्व सदस्य,मुख्याध्यापिका विजया हाडवळे,शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले की,"शिक्षण हे विकासाचे मुख्य साधन आहे, ग्रामीण भागातील शाळांना मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे." सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शाळांपैकी ग्रामीण भागातील एकमेव सुरू असलेली व स्तूस्थितीत असलेली ही शाळा पाहून आम्हाला खूप आनंद होत असून यापुढेही शाळेला आवश्यक त्या सुविधा पुरविण्याचा आम्ही प्रयत्न करू असे पाहुण्यांनी आश्वस्त केले.शाळेच्या मुख्याध्यापकां नी "हिसोआ इलेक्ट्रॉनिक प्रा. लि.-विवो पुणे कंपनीचेआभार मानले असून, या सुविधांमुळे पटसंख्या वाढण्यास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. सदर कार्यक्रम प्रसंगी शिवकांत चव्हाण फायनान्स मॅनेजर, प्रमोद वाघ अर्पण पराते मीनल शहा,अविनाश मस्करे, विपुल ओझरकर, सोमनाथ तोडकर त्याचबरोबर उर्मी संस्था वाकडेवाडी शिवाजीनगर पुणे चे प्रतिनिधी राहुल शेंडे सचिव ऊर्मी संस्था. दिलीप तिडके,राहुल चुनीदास प्रकल्प व्यवस्थापक व जुन्नर तालुका ऊर्मी समन्वयक ज्ञानेश्वर गटकळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता हिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवींद्र डुंबरे,मंगल घोलप, पुष्पांजली असवले, सुवर्णा हांडे,शारदा भोर,पल्लवी दिघे,श्रीम.अश्विनी आव्हाड, श्रीम. सुजाता मंडलिक या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### भिला मन्साराम मुसळदे यांचा उदगीर येथे काव्य पुरस्काराने सन्मान

नंदुरबार (स. गांवकरी) : नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील तिखोरा या छोट्याशा ग्रामीण भागातून आलेल्या आणि सध्या छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असणाऱ्या युवा कवी भिला मुसळदे यांना उदगीर येथे विशेष काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी आपल्या संवेदनशील लेखणीच्या माध्यमातून साहित्य विश्वात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील राधाकृष्ण मंगल कार्यालयात नामांकित लेखिका व कवयित्री डॉ. वर्षा मुस्कावाड यांच्या 'बाप' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी कवी भिला मुसळदे यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. गेल्या ७-८ वर्षांपासून कविता, चारोळ्या व कथालेखनाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत, या कार्यक्रमात त्यांना मान्यवरांच्या हस्ते काव्य पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. आदिवासी समाजातील एका अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या भिला मन्साराम मुसळदे यांनी बिकट परिस्थितीचा सामना करत साहित्य साधना सुरू ठेवली आहे. "या संपूर्ण प्रवासात माझ्या वडिलांचा माझ्यावरील विश्वास आणि त्यांची मेहनत हेच माझे मुख्य प्रेरणास्थान आहे. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी वडिलांचा पाठिंबा मला सतत पुढे जाण्याची ताकद देतो," अशी भावना त्यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली.

### गोदावरी अर्बन सर्वोत्तम शाखा प्रभारी म्हणून सिडको शाखेचे गजानन पाटील सन्मानित

नवीन नांदेड (स. गांवकरी) : गोदावरी अर्बन बँकेची 13 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 27 रोजी संपन्न झाली 2025 -2026 वर्षातील सर्व राज्यांतील सर्वोत्तम शाखा प्रभारी म्हणून सिडको शाखेचे गजानन पाटील यांना संस्थापकीय अध्यक्ष,आ. हेमंतभाऊ पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. गोदावरी अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा संस्थापकीय अध्यक्ष आ.हेमंत पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली ,या सभेत उत्कृष्ट शाखाधिकारी सिडको शाखेचे शाखाधिकारी गजानन पाटील यांना सन्मानित करण्यात आले, यावेळी नांदेड ऊतर आ.बालाजी पाटील कल्याणकर, दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोढारकर,गोदावरी अर्बनच्या अध्यक्षा,सौ.राजश्री हेमंत पाटील उपाध्यक्ष हेमलता देसले ,सचिव विधिज्ञ रवींद्र रगटे ,सर्व संचालक मंडळ व्यवस्थापकीयसंचालक धनंजय तांबेकर,सौ.सुरेखा दवे , यांच्या सह शाखाधिकारी व कर्मचारी उपस्थिती होते.

### बाबुराव कदम कोळेकर यांच्या पुढाकाराने शिबिराचे आयोजन



हिमायतनगर (स. गांवकरी) : नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही आवश्यक वैद्यकीय उपचार मिळावेत, या उद्देशाने बाबुराव कदम कोळेकर यांच्या पुढाकाराने दि. ४ सप्टेंबर २०२० रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या महाआरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांवरील तपासण्या, वैद्यकीय सल्ला तसेच आवश्यक त्या चाचण्या विनामूल्य करण्यात आल्या. शिबिरात गरजू रुग्णांची तपासणी करून पुढील उपचारांची माहिती देण्यात आली. तसेच आवश्यक असलेल्या रुग्णांसाठी विविध शस्त्रक्रियांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली, त्यामुळे अनेक गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन केले. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेण्यास विलंब करणाऱ्या नागरिकांसाठी हे शिबिर विशेष उपयुक्त ठरले. आरोग्यसेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे आयोजित करण्याची गरज असून, बाबुराव कदम कोळेकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. विनामूल्य आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या आणि शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरातील अनेक नागरिकांना या महाआरोग्य शिबिराचा लाभ मिळाला.

### पीएच.डी. कोर्सवर्क ऑक्टोबर २०२६ परीक्षेसाठी अर्ज भरण्याचे आवाहन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संकुलातील तसेच विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांतील पीएच.डी. संशोधकांसाठी पीएच.डी. कोर्सवर्क ऑक्टोबर २०२६ परीक्षेचे आयोजन ऑफलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. ही परीक्षा लेखी स्वरूपात Pen & Paper पद्धतीने घेण्यात येणार आहे. Online NPTEL-SWAYAM पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित संशोधन केंद्रात विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र सादर करावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी रु. ३४०/- परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले आहे. परीक्षा आवेदनपत्र ३० सप्टेंबर ते १३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संबंधित विद्यापीठ संकुल अथवा संशोधन केंद्र येथे ऑनलाइन शुल्कासह सादर करावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध QR कोडद्वारे ऑनलाइन परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख १६ ऑक्टोबर २०२६ आहे. तसेच संबंधित संकुले व संशोधन केंद्रांनी परीक्षा आवेदनपत्रे आणि परीक्षा शुल्क १६ ऑक्टोबर २०२६ रोजी परीक्षा विभागाकडे सादर करावीत. पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षेसंदर्भातील सर्व संबंधित विद्यार्थी, संशोधकांनी वेळेच्या आत आवेदणपत्र सादर करावीत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

### उत्कृष्ट कलाकृतींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

डांग (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील वघई येथील शासकीय कृषी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जिल्हा शिक्षणाधिकारी जिग्नेशकुमार त्रिवेदी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय विज्ञान, गणित व पर्यावरण प्रदर्शनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.या प्रसंगी जिल्हा शिक्षणाधिकारी जिग्नेशकुमार त्रिवेदी यांच्यासह जिल्हा पंचायत उपाध्यक्ष उषाबेन डी. पटेल, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण भवन, वाघईचे प्राचार्य बी.एम. राऊत, जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालय, आहवा-डांगचे शिक्षण निरीक्षक एस.एच. परमार व आर.ए. टंडेल यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शिक्षण विभागातील अधिकारी व शिक्षक उपस्थित होते. ग्रामीण तसेच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, त्यांच्या सर्जनशीलतेला व प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व नाविन्यपूर्ण विचारांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

# सरकारविरोधात जोरदार निदर्शने

किनवट : (स. गांवकरी)

राज्य सरकारने नुकताच जाहीर केलेला दुष्काळी जीआर हा अत्यंत फसवा आणि शेतकरी, कामगार व शेतमजुरांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे, असा गंभीर आरोप करत शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने किनवट तहसील कार्यालयाच्या प्रांगणात सोमवारी, २८ सप्टेंबर रोजी शासनाच्या या जीआरची होळी करून तीव्र रोष व्यक्त करण्यात आला. यावर्षीच्या खरीप हंगामात किनवट आणि माहूर तालुक्यांत अत्यल्प पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके करपून गेली असून दोन्ही तालुके दुष्काळाच्या तीव्र छायेखाली आले आहेत. या गंभीर परिस्थितीवर शिवसेना (उबाठा) पक्षाने राज्य सरकारला धारेवर धरल्यानंतर सरकारने दुष्काळ जाहीर करून तसा जीआर प्रसिद्ध केला. मात्र, या



किनवट येथे शिवसेना(उबाठा) पक्षाने केली दुष्काळी जीआरची होळी

जीआरमध्ये दुष्काळ निवारणासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नसून शेतकरी व मजुरांना कोणताही समाधानकारक दिलासा दिलेला नाही. त्यामुळे हा जीआर 'कुचकामी' असल्याचा थेट आरोप शिवसेनेने केला आहे. या आंदोलनात शेकडो शिवसैनिक आणि शेतकरी बांधव सहभागी झाले होते. तहसील कार्यालयाच्या प्रांगणात जीआरची होळी करताना "या सरकारचे करायचे काय, खाली मुंडके वरती पाय!" आणि "केंद्र व राज्य सरकार मुर्दाबाद!" अशा जोरदार घोषणाबाजीने परिसर संपूर्ण दणाणून गेला होता. शिवसेनेचे तालुकाप्रमुख मारुती दिसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले या आंदोलनात शहरप्रमुख संतोष यलचलवार, स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे,युवासेनेचे तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड,प्रभू कोल्हे, सर्कल प्रमुख बजरंग वाडगुरे, प्रमोद जाधव, पंडित रासमवार, शैलेश बेलसरवार, संतोष तक्कलवार, सुनील तक्कलवार, प्रशांत डांगे, इंदल राठोड, महेश मंडारे,आनंद केतकर, रवी भुरेवार, सचिन बोईनवार, कृष्णा गोविंदवाड, संतोष वाघाडे, भैया मैत्री, साई बैलवाड, योगेश जाधव, प्रदीप डुडेल,अजय चुलगुलवार, संजय मामीडवार, रघुनाथ चटेकर, शिवशंकर परसेवाड, रमेश पडवळ, शेख मुबारक, चंद्रमणी कसबे, पिर खान, अमोल गरडे, उमेश जाधव आणि सुधाकर मुक्करवार यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किनवटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा द्या : ॲड. माझ बडगुजर

किनवट : (स. गांवकरी)

किनवट तालुक्याचा वाढता विस्तार, लोकसंख्या आणि आदिवासी बांधवांच्या प्रशासकीय अडचणी लक्षात घेऊन किनवट येथे तात्काळ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे, इस्लापूर व मांडवी यांना स्वतंत्र तालुक्याचा दर्जा द्यावा तसेच किनवटला स्वतंत्र जिल्हा घोषित करण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे (नांदेड उत्तर) जिल्हाध्यक्ष ॲड. माझ बडगुजर यांनी राज्य सरकारकडे केली आहे. याबाबत त्यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लेखी निवेदन सादर केले आहे.



निवेदनात नमूद केल्यानुसार, किनवट तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र विस्तीर्ण असून येथे आदिवासी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. महसूल तसेच इतर प्रशासकीय कामकाजासाठी येथील नागरिकांना सुमारे दीडशे ते दोनशे किलोमीटर दूर नांदेड जिल्हा मुख्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. यामुळे दुर्गम भागातील शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि विशेषतः आदिवासी बांधवांचा मोठा वेळ, पैसा व श्रम खर्च होतो. किनवट येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यास प्रशासकीय सेवा थेट लोकांच्या दारात उपलब्ध होऊन कारभार अधिक लोकाभिमुख आणि गतिमान होईल.

## ओप्पोने भारतात के१४ प्लस सादर केला

पुणे : (स. गांवकरी)

ओप्पो इंडियाने आज ओप्पो के१४ प्लसच्या सादरीकरणाची घोषणा केली. हा के मालिकेतील एक शक्तिशाली नवीन स्मार्टफोन असून, त्यामध्ये कार्यक्षमता, मनमोहक मनोरंजन, प्रगत छायाचित्रण आणि दीर्घकाळ टिकणारी क्षमता यांचा संगम करण्यात आला आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी ७३६० मॅक्सद्वारे संचालित या स्मार्टफोनमध्ये १.५के १४४ हर्ट्झ अमोलेड अल्ट्रा ब्राइट डिस्प्ले, ६ वर्षे टिकणारी ८००० एमएएच मोठी बॅटरी, ४के व्हिडिओसह ५० मेगापिक्सेल ओआयएस मुख्य कॅमेरा आणि सातत्यपूर्ण कार्यक्षमतेसाठी ५००० चौ. मिमी वाफ कक्ष देण्यात आला आहे. ओप्पोच्या "कार्यक्षमतेसाठी सज्ज, दीर्घकाळ टिकण्यासाठी बनवलेला" या संकल्पनेभोवती विकसित केलेला के१४ प्लस, दैनंदिन वापरातील आव्हानात्मक गरजांशी जुळवून घेत सुरळीत आणि विश्वासार्ह अनुभव




देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. तसेच, दीर्घकालीन कार्यक्षमता आणि टिकाऊपणाचा विश्वासही तो प्रदान करतो. ६ जीबी+१२८ जीबी प्रकाराची किंमत २९,९९९ रुपये, ८ जीबी+१२८ जीबी प्रकाराची किंमत ३२,९९९ रुपये आणि ८ जीबी+२५६ जीबी प्रकाराची किंमत ३५,९९९ रुपये आहे. ओप्पो के१४ प्लसची विक्री ८ ऑक्टोबर २०२६ पासून—बिग बिलियन डेजच्या पहिल्या दिवशी—फ्लिपकार्ट आणि ओप्पो इंडिया ई-स्टोअरवर मध्यरात्री १२ वाजल्यापासून सुरू होईल.

## फेकलेल्या जीन्सपासून नव्या उपजीविकेपर्यंत

### महाराष्ट्रातील २१ वर्षीय नावीन्यवाहकाला भेटा, जी डेनिम कचऱ्याला संधीत रूपांतरित करत आहे

पुणे : (स. गांवकरी)

जर जुनी जीन्सची जोडी लँडफिलमध्ये जाण्यापासून वाचवली जाऊ शकली—आणि एका महिलेला उपजीविका कमवण्यास मदत करू शकली, तर?

हीच ती कल्पना आहे जी 21 वर्षीय महाराष्ट्रातील नावीन्यवाहक योगीता किशोरला चालना देत आहे, जी गेल्या दीड वर्षांपासून डेनिम कचऱ्याला संधीत रूपांतरित करण्यासाठी काम करत आहे.

तिचा उपक्रम, Indiejeanous, फेकलेल्या डेनिम आणि कापडाच्या तुकड्यांचे जीवनशैली उत्पादनांत रूपांतर करतो आणि महिला कारागिरांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करतो. आता Samsung Solve for Tomorrow 2026 च्या टॉप 20 संघांमध्ये निवडले गेल्याने, योगीता प्रोटोटाइप विकसित करण्यासाठी काम करत आहे आणि तिची समुदाय-आधारित




कल्पना विस्तारणीय उद्योगात कशी वाढू शकते हे शोधत आहे.

"मी Samsung Solve for Tomorrow चा भाग असल्याबद्दल कृतज्ञ आहे. अभिप्राय आणि पुनरावलोकने मिळणे अद्भुत आहे, आणि हे तरुण बदल घडवणाऱ्यांसाठी एक उत्तम प्लॅटफॉर्म वाटते," ती म्हणाली. कचऱ्याचे पुनर्वापर करण्यापासून व्यवहार्य उपाय निर्माण करण्यापर्यंत कार्यक्रमाच्या बूटकॅम्पमध्ये सहभागी होण्यापूर्वी, योगीताचा दृष्टिकोन प्रामुख्याने फेकलेल्या कापडाला दुसरे जीवन देण्यावर केंद्रित होता. मेंटर्स, तज्ज्ञ आणि सहकारी नावीन्यवाहकांशी झालेल्या संवादांनी तिला कापड कचऱ्याच्या संपूर्ण प्रवासाचा विचार करण्यास आणि तिच्या उपायाचा अंतिमतः वापर किंवा लाभ घेणाऱ्या लोकांबाबत अधिक जवळून विचार करण्यास प्रोत्साहित केले. "माझ्या कल्पनेत मोठा फरक आहे. आधी आम्ही फक्त अपसायक्लिंगवर केंद्रित होतो, पण आता आम्ही तो कचरा कसा वापरला जाऊ शकतो याकडे अधिक खोलवर पाहत आहोत. आम्ही प्रोटोटाइपिंग सुरू केले आहे," योगीता म्हणाली.

या अनुभवामुळे तिला हे ओळखता आले की अर्थपूर्ण कल्पना केवळ पर्यावरणासाठीच नाही, तर तिच्या ग्राहकांसाठी आणि ज्या समुदायाला ती पाठिंबा देऊ इच्छिते त्यांच्यासाठीही कार्य करणे आवश्यक आहे.

"तुम्हाला ग्राहकाला समजून घ्यावे लागेल आणि खात्री करावी लागेल की उपाय प्रामाणिकपणे समुदायाच्या गरजा पूर्ण करतो," ती पुढे म्हणाली. Indiejeanous ची सादरीकरण ज्यूरीसमोर करणे आणि भारतातील विविध भागांतून आलेल्या तरुण नावीन्यवाहकांशी चर्चा करणे यामुळे योगीताला या उपक्रमामधून काय होऊ शकते याची व्याप्ती समजली.

## शाश्वत पर्यावरणपूरक बांधकामांना प्राधान्य ही काळाची गरज

### बांधकाम क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

पुणे : (स. गांवकरी)

"वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर बांधकाम क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यावरणीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि शाश्वत बांधकाम पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रवण हर्डीकर यांनी केले. शाश्वत पर्यावरणपूरक बांधकामांना प्राधान्य ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाच्या ग्रीन रेटिंग फॉर इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंट (ग्रिहा), दी एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट (टेरी) व नॉलेज पार्टनर सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ह (एसआय) या संस्थांच्या वतीने आयोजित 'ग्रिहा रिजनल कॉन्क्लेव्ह'च्या उद्घाटनप्रसंगी हर्डीकर बोलत होते. 'कमी कार्बन




उत्सर्जनाचा भविष्यकालीन मार्ग: बांधकामांपासून पायाभूत सुविधांपर्यंत' अशी या परिषदेची संकल्पना होती. कोरेगाव पार्क येथील हॉटेल कॉनरॅडमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (आयसर) संचालक डॉ. सुनील भागवत, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रसाद मोडक, 'ग्रिहा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शेठ, 'टेरी'च्या शाश्वत बांधकाम विभागाच्या संचालिका शबनम बस्सी, व्ही. के. ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक हृषीकेश कुलकर्णी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी मुख्य अभियंता विवेक खरवडकर, बांधकाम व्यावसायिक सर्वेश जावडेकर, आर्कि. अनुजा पंडित, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हच्या विश्वस्त अनघा परांजपे-पुरोहित, विजय साने, उपेंद्र देशपांडे, डी. वाय. पाटील महाविद्यालयातील प्रा. दिनेश झोपे, विश्वकर्मा विद्यापीठातील स्कुल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंगच्या अधिष्ठाता डॉ. प्रीती धनवट आदी उपस्थित होते. यावेळी 'ग्रिहा'ने विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे व डी. वाय पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई यांच्याशी सामंजस्य करार केला. श्रवण हर्डीकर म्हणाले, "शाश्वत विकास हवा असेल, तर प्रत्येकाने पुढाकार घेऊन काम करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणपूरक बांधकाम न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढलेले दिसते, त्यावर नियंत्रण येण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे." डॉ. सुनील भागवत म्हणाले, "शाश्वततेच्या दृष्टीने येत्या काळात भारत जगाचे नेतृत्व करू शकतो. शाश्वतता महत्वाची आहेच; पण अर्थशास्त्र आणि मानवी गरजा हे त्यापेक्षाही जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक व शाश्वत विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याची गरज आहे."

## अतिक्रमणावरून वंचित बहुजन आघाडी आक्रमक

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)

दिवा स्टेशन परिसर, मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा–आगासन रोड तसेच शहरातील प्रमुख रस्ते व पदपथांवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. फेरीवाल्यांमुळे पदपथांवरील पादचाऱ्यांची जागा कमी झाली असून, अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या प्रश्नाकडे ठाणे महानगरपालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन केवळ अधूनमधून कारवाई न करता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे विकास प्रकाश इंगळे यांनी केली. फेरीवाल्यांच्या रोजगाराचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी नागरिकांचे रस्ते व पदपथ अडवून व्यवसाय करण्याला पर्याय म्हणून पात्र



फेरीवाल्यांसाठी नियोजित फेरीवाला झोन निश्चित करावा, अशी मागणीही करण्यात आली. दिवा शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर नागरिकांना सोबत घेऊन ठाणे महानगरपालिका प्रशासनाविरोधात धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा इंगळे यांनी दिला. दिवा स्टेशन परिसरातील पादचारी व वाहतुकीसाठी आवश्यक जागा मोकळी करावी तसेच कारवाईनंतर पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी करण्यात आली.

## बंधन फ्लेक्सी कॅप फंड २१ वर्षांचा झाला

पुणे : (स. गांवकरी)

बंधन फ्लेक्सी कॅप फंडाला २१ वर्षे पूर्ण होत असताना, हा टप्पा केवळ आकड्यांपलीकडे जाऊन, फंडाच्या दृष्टिकोनाला आकार देणाऱ्या गुंतवणूक तत्त्वज्ञानावर चिंतन करण्याची संधी देतो. अशा युगात, जिथे बाजाराचे नेतृत्व झपाट्याने बदलते, गुंतवणुकीच्या पद्धती लोकप्रिय होतात आणि त्यांची लोकप्रियता कमी होते, आणि गुंतवणूकदारांना अनेकदा नवीनतम ट्रेंडच्या मागे धावण्याचा मोह होतो, तिथे फंडाचा मूळ आधार संतुलन, विविधीकरण आणि अनुकूलनक्षमतेमध्ये रुजलेला आहे. इक्विटी गुंतवणुकीतील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे, बाजाराच्या विविध चक्रांमध्ये कोणतीही एकच गुंतवणूक पद्धत सातत्याने सर्वोत्तम

25 YEARS Bandhan AMC

- बाजारातील चढ-उतार समजून घेऊन त्यानुसार वाटचाल करण्याच्या उद्देशाने स्वीकारलेला एक सुविचारित दृष्टिकोन.

कामगिरी करत नाही. वेगवेगळ्या वेळी, मोमेंटम स्टॉक्सनी सर्वाधिक परतावा दिला आहे, तर इतर काळात व्हॅल्यू, क्वालिटी, ग्रोथ किंवा कमी-अस्थिरतेच्या धोरणांनी आघाडी घेतली आहे. पुढील काही वर्षांत कोणती पद्धत प्रभावी ठरेल याचा अंदाज लावणे, बाजारातील अनुभवी गुंतवणूकदारांसाठीही कठीण असू शकते.

## किस्टोन मध्ये 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहात संपन्न

### २६ कंपन्यांचा सहभाग, ६०० हून अधिक उमेदवारांची नोंदणी

पुणे : (स. गांवकरी)

शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना थेट उद्योगविश्वाशी जोडून त्यांच्या कौशल्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने Keystone School of Engineering तर्फे आयोजित करण्यात आलेला 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध शैक्षणिक पात्रता आणि शाखांतील युवक-युवतींना एकाच व्यासपीठावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरला.

या रोजगार महाकुंभाचे उद्घाटन डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना




बदलत्या उद्योगविश्वातील गरजा, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या उपलब्ध संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या महाकुंभात विविध क्षेत्रांतील २६ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला, तर कंपन्यांचे ७५ हून अधिक प्रतिनिधी उमेदवारांच्या निवड प्रक्रियेसाठी उपस्थित होते. रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी ६०० हून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली. विविध कंपन्यांच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांच्या मुलाखती, कौशल्य चाचण्या आणि निवड प्रक्रिया दिवसभर घेण्यात आली. या माध्यमातून १०० हून अधिक रोजगाराच्या ऑफर्स मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. 'रोजगार महाकुंभ २०२६'चे वैशिष्ट्य म्हणजे केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांपुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

यामध्ये प्रामुख्याने पाच श्रेणींचा समावेश करण्यात आला होता. ITI व Diploma, BBA व BCA, Core Engineering, IT Related Engineering आणि Post Graduate या पाचही श्रेणींतील उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार विविध कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध झाल्या. यामुळे पारंपरिक अभियांत्रिकी क्षेत्राबरोबरच IT, व्यवस्थापन, संगणक अनुप्रयोग, तांत्रिक तसेच इतर विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी शोधणाऱ्या युवकांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध झाले.

# तुळशी गावच्या ग्रामस्थांनी घेतला 'गाव विकण्याचा' निर्णय"

## २५ वर्षे लोटली तरीही उजनीचे पाणी तुळशी गावा पर्यंत पोहचवण्यास प्रशासन असमर्थ

सोलापूर : (स. गांवकरी)

२५ वर्षे उलटली तरीसुद्धा माढा तालुक्यातील मोडनिंब जवळ असलेल्या तुळशी या गावात अद्याप ही पाणी पोहचले नाही. त्यामुळे अखेर सर्व ग्रामस्थांनी मिळुन महत्वाचा निर्णय घेतला गावच विकायचे! गावच विकायला काढल्यामुळे साऱ्या राज्याचे लक्ष या गावाकडे लागून राहिले आहे.




२५ वर्षे उलटली तरीही उजनी धरणाचे पाणी या गावाला मिळाले नाही; म्हणून शेवटी ग्रामस्थांनी 'गाव विकण्याचा' निर्णय घेऊन सरकार पुढे मोठे आव्हान उभे केले आहे.

यंदाच्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असताना उजनीचे पाणी शेतीसाठी मिळावे यासाठी शेतकरी काही ठिकाणी रस्ता रोको करून, काही ठिकाणी आमरण उपोषण करून तर काही ठिकाणी पाण्याच्या टाकीवर चढून उपोषण करत शासन व प्रशासनाचे लक्ष वेधत आहेत मात्र सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील तुळशी ग्रामस्थांनी मात्र उजनीच्या पाण्यासाठी वेगळी शक्कल लढवली आहे. 'गाव विकणे आहे' असा फलक ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावल्यामुळे या गावाची राज्यभर चर्चा सुरू झाली आहे. मध्यंतरी ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवून तहसील कार्यालयावर मोर्चा काढला होता. सरपंचासह अन्य नागरिक उपोषणासाठी गावातच बसले तर गावातील अनेक नागरिक पाण्याच्या टाकीवरून चढून आंदोलन केले. एका शेतकऱ्याने हातात डिझेल डबा घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस वेळीच पोहोचल्यामुळे त्या शेतकऱ्यास तात्काळ रोखले. पाच दिवस उलटल्यानंतर त्यांच्या उपोषणाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंत्रालयात बैठक लावण्याचे आश्वासन दिले.



ठाणे : शिवसेना दिवा शहरप्रमुख तथा माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या निवासस्थानी साखरचौथ निमित्त गणपती बाप्पाचे आगमन झाले प्रसंगी दर्शनासाठी अनेक गणेशभक्तांसह नगरसेवक शैलेश पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गणरायाच्या दर्शनाला हजेरी लावली. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी फुलवली सेंद्रिय परसबाग

आळेफाटा (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव आनंद येथे विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेती, पर्यावरण संवर्धन तसेच श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावे, यासाठी शालेय परिसरात सेंद्रिय पद्धतीने परसबाग विकसित करण्यात आली आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध पालेभाज्या, फळभाज्या, फुलझाडे तसेच औषधी वनस्पतींची ओळख होत असून, शेतीविषयक ज्ञानही प्रत्यक्ष कृतीतून मिळत आहे. या परसबागेत आले, हळद, कोरफड, तुळस, गवती चहा, अडुळसा आणि सब्जा यांसारख्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. तसेच दुधी भोपळा, घोसाळे, डांगर भोपळा, कारले, काकडी, तोंडली आदी वेलवर्गीय भाज्यांची लागवड करण्यात आली आहे. वांगी, कोबी, टोमॅटो, बटाटा, कांदा, फरसबी, अळू आदी भाज्यांचे उत्पादन घेण्याचा अनुभवही विद्यार्थी घेत आहेत. विविध प्रकारची फुलझाडे विद्यार्थ्यांनी स्वतः लावून शालेय परिसर अधिक हिरवागार व आकर्षक केला आहे. या उपक्रमासाठी माननीय किसन महादू चौगुले यांनी आल्याचे रोप शाळेला मोफत उपलब्ध करून दिले. तसेच पिकांसाठी आवश्यक सेंद्रिय खते व बी बियाणे श्री. अविनाश आढाव यांनी व पंचायत समिती जुन्नर या कार्यालयाचे कृषी विभागाचे अधिकारी निलेश बुधवंत यांनी देखील विविध रोप व सेंद्रिय खते उपलब्ध करून दिली. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय पद्धतीने पिकांची लागवड, निगा व वाढ कशी करावी, याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळत आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. प्रदीप गडगे तसेच महिला भगिनींनी परसबागेच्या मशागतीसाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते डी. बी. नाना वाळुंज आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय चौगुले यांनी विशेष प्रयत्न केले. मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, सहशिक्षिका छाया डुंबरे, सुनंदा तांबे, गीता बोऱ्हाडे आणि सविता खेत्री यांनी उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले. शालेय परसबागेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये 'शिका आणि प्रत्यक्ष कृतीतून शिका' या संकल्पनेला चालना मिळत असून, शेतीचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा आणि निसर्गाशी नाते यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत आहेत.

### जिल्हा न्यायालय सुरू नाही



डांग-गुजरात (स. गांवकरी) : पक्षकार आणि वकिलांना लांबचा प्रवास करावा लागत असल्याने आहवा बार असोसिएशनची जिल्हा न्यायालय सुरू करण्याची मागणी डांग जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या आहवा येथे जिल्हास्तरीय विविध शासकीय कार्यालये कार्यरत असतानाही जिल्हा न्यायालयाची पूर्ण कार्यवाही अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी पक्षकार, असील तसेच संबंधित नागरिकांना लांबचा प्रवास करावा लागत असल्याचा मुद्दा समोर आला आहे. याबाबत आहवा बार असोसिएशनने आहवा येथेच जिल्हा न्यायालय सुरू करण्याची मागणी करत ठराव केला आहे. आहवा बार असोसिएशनच्या ठरावानुसार, महाराष्ट्रापासून गुजरात राज्य वेगळे झाल्यानंतर डांग जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या आहवा येथे जिल्हास्तरावरील अनेक महत्त्वाची शासकीय कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. डांग हा आदिवासीबहुल तसेच भौगोलिकदृष्ट्या दुर्गम जिल्हा असल्याने नागरिकांना प्रशासकीय तसेच न्यायालयीन सेवा त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे बार असोसिएशनने म्हटले आहे. 23 ऑगस्ट 2023 रोजी आहवा येथे फुल कोर्ट बिल्डिंगचे उद्घाटन करण्यात आले होते. मात्र, उद्घाटनानंतरही आहवा येथे जिल्हा न्यायालयाची पूर्ण कार्यवाही सुरू झालेली नसल्याचा मुद्दा बार असोसिएशनने उपस्थित केला आहे.ठरावात नमूद केल्यानुसार, जिल्हास्तरावरील काही महत्त्वाची प्रकरणे तसेच न्यायालयाशी संबंधित कामकाज नवसारी येथे हस्तांतरित करण्यात आले आहे. आहवा ते नवसारी हे अंतर सुमारे 180 किलोमीटर असल्याने डांग जिल्ह्यातील पक्षकार व असीलांना न्यायालयीन कामकाजासाठी वारंवार नवसारी येथे जावे लागत आहे.

### गि.दे.पाटील विद्यालयात ३५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

नाशिक (स. गांवकरी) : महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात नाशिक येथील सिव्हिल हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाच्यावतीने इयत्ता सहावी ते दहावीच्या ३५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात डॉ. अविनाश देवरे, डॉ. सोनाली आव्हाड, समुपदेशक डॉ. प्रीती मगर तसेच फार्मासिस्ट अंतिलाल सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या विविध आरोग्यविषयक समस्यांची माहिती घेऊन आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

# डॉ. बी. रेड्डी यांना ग्लोबल ग्रीन टीचर अवॉर्ड २०२६

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षकाचा गौरव

नांदेड जिल्हा (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांना ग्रीन मेंटर्स संस्थेकडून ग्लोबल ग्रीन टीचर अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला आहे. क्लायमेट वीक NYC दरम्यान १० व्या NYC ग्रीन स्कूल कॉन्फरन्समध्ये SUNY ग्लोबल सेंटर येथे हा सन्मान त्यांना मिळाला. हा पुरस्कार न्यूयॉर्कचे स्टेट सेनेटर गुस्तावो रिवेरा आणि NYC महापौर कार्यालयाचे उप-प्रमुख दिलीप चौहान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. रेड्डी म्हणाले की, हा सन्मान मिळाल्याने ते अत्यंत अभिमानी आणि भावूक झाले आहेत. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करून समतापूर्ण, हवामान-जागरूक आणि सर्वांसाठी सुलभ शिक्षण प्रणाली निर्माण करण्याच्या प्रयत्नांना या पुरस्काराने दुजोरा



दिला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील त्यांच्या १५ वर्षांच्या प्रवासातील योगदानाची दखल ग्लोबल ग्रीन अवॉर्ड ज्युरीने घेतली. त्यामध्ये मोफत आणि ओपन सोर्स सॉफ्टवेअर तसेच SWAYAM MOOCs चा वापर करून ज्ञानाचे लोकशाहीकरण, १.२ दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत शिक्षण पोहोचवणे; कोविड-१९ महामारीच्या काळात भारतभरातील १७,००० हून अधिक शिक्षकांना डिजिटल शिक्षणाचे प्रशिक्षण; कमी कागदाचा वापर, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी युनिव्हर्सिटी इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टमचा विकास; तसेच AI, डेटा सायन्स आणि NEP अंमलबजावणीद्वारे पुढील पिढीला सज्ज करणे यांचा समावेश आहे.

डॉ. रेड्डी यांनी हा पुरस्कार आपल्या कुटुंबाला समर्पित केला. त्यांच्या कुटुंबाच्या अतूट पाठिंब्याशिवाय हे शक्य झाले नसते, असे ते म्हणाले. त्यांनी आई बी. सुभद्राम्मा, बंधू बी. गजेंद्रनाथ रेड्डी आणि त्यांचे कुटुंब, पत्नी डॉ. रुपाली एस. जैन यांनी हार्दिक व रोहित यांचे आभार मानले. तसेच डॉ. वीरेंद्र रावत आणि ग्रीन मेंटर्स टीमचेही त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

शिक्षणाला शाश्वत भविष्याचे सशक्त साधन बनवण्यासाठी सर्वांनी मिळून नावीन्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठातील कुलगुरू डॉ मनोहर चासकर, यांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# दुष्काळाच्या सावटात अडकली आवास योजनेतील गोर गरिबांची घरे

सोलापूर : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातील बेघरांना हक्काचे घर देणाऱ्या 'प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण' (टप्पा-२) ला सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाचा मोठा फटका बसला आहे. आधीच उद्दिष्टपूर्तीत पिछाडीवर असलेल्या सोलापूर जिल्ह्यात आता तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीमुळे घरकुल बांधकामाची कामे मोठ्या प्रमाणात पूर्णपणे थांबली आहेत. विशेष म्हणजे, शासनाकडून पहिला हप्ता खात्यावर जमा होऊनही जिल्ह्यातील तब्बल ५९ हजार लाभार्थ्यांनी अद्याप बांधकामाची एक वीटही रचलेली नाही. घरकुल बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठीच




गावकऱ्यांना भटकंती करावी लागत आहे. अशा परिस्थितीत बांधकामासाठी पाणी कोठून आणायचे, असा उघड प्रश्न लाभार्थी विचारत आहेत. सोबतच मजुरांची टंचाई आणि वाळू-सिमेंटच्या वाढलेल्या दरांमुळेही बांधकामे खोळंबली आहेत. जिल्ह्यातील ९४,३२५ लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाला असला, तरी ३९ हजार लाभार्थ्यांनी अद्याप बांधकामाची एक वीटही रचलेली नाही. दुष्काळामुळे पाण्याचा गंभीर प्रश्न सध्या सोलापूर जिल्ह्यात निर्माण झाला आहे.

# रोजगार मेळाव्याला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद



भिवंडी : (स. गांवकरी)

पडघा-बोरीवली परिसरातील युवक-युवतींना कौशल्य विकासासह रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी नवी वस्ती, पडघा-बोरीवली येथील गुजर हॉलमध्ये हा मेळावा उत्साहात पार पडला. या उपक्रमातून युवक-युवतींना प्रशिक्षण, कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास, नोकरीसाठी मार्गदर्शन व सहाय्य, व्यवसाय मार्गदर्शन तसेच रोजगाराच्या विविध संधींबाबत माहिती देण्यात आली.

अनेक युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यास आवर्जून हजेरी लावत विविध प्रशिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत ३५०० ते ४०० युवक, युवतींनी माहिती घेतली. यावेळी नवी मुंबई कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीणा, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, ठाणे ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, गणेशपुरी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालटे तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे कार्यक्रम समन्वयक संजय लोखंडे प्रमुख उपस्थित होते. रोजगार मेळाव्यात प्रशिक्षण व रोजगार संदर्भात विविध स्टॉल उभारण्यात आले होते.

# दैनिक लोकपरिवर्तनचा वर्धापन दिन व सन्मान सोहळा उत्साहात संपन्न!

## पत्रकारिता, डिजिटल मीडिया व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; 'निर्भीड, निष्पक्ष आवाज जनतेचा' या भूमिकेचा निर्धार!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

"निर्भीड, निष्पक्ष आवाज जनतेचा" हे ब्रीदवाक्य घेऊन पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या दैनिक लोकपरिवर्तनचा वर्धापन दिन व सन्मान सोहळा रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथील नाथकृपा सांस्कृतिक भवन, न्यू टिळक रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पत्रकारिता, डिजिटल मीडिया, सामाजिक कार्य, कला, अध्यात्म, मानवाधिकार, चित्रपटसृष्टी यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर समाजसेवक कॉ. बाबाजी आरगडे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दत्तात्रय गाडगे, राष्ट्रीय प्रवक्ते संजय वाल्हेकर, भारत विकास परिषदेच्या अध्यक्षा राशी रासकर, कांतिलाल पुरोहित, ह.भ.प. दर्शन महाराज कबाडी (झी टॉकीज – मनमंदिरा), गायक गणेश आस्वार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय मानवाधिकार हक्क संस्थापक राजेंद्र लिंगाडे,



चित्रपट निर्माता रामदास राऊत, शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे संजय वाघमारे, राष्ट्रीय मानवाधिकार हक्क अध्यक्षा सौ. हिराताई आबासाहेब शिरसाठ, आरपीआय महिला अध्यक्ष अलकाताई बोराडे आणि रिलस्टार नेहा गायकवाड यांचीही विशेष उपस्थिती होती.

दैनिक लोकपरिवर्तनचे संपादक डॉ. आबासाहेब शिरसाठ, उपसंपादक डॉ. पोपटराव सोनवने, कार्यकारी संपादक डॉ. भारत भालेराव, वृत्तसंपादक प्रा. अशोक सूर्यवंशी आणि व्यवस्थापक डॉ. मुकुंद निघोजकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब देवखिळे, पत्रकार बादल परदेशी, प्रियांक बेल्हेकर, राजेंद्र शिरसाट, सुमित राज पाटरे, सुरेश घुंगासे, सामाजिक कार्यकर्ते विजय शिरसाठ, सचिन कुरुंद, अहिल्यानगर प्रतिनिधी इंजि. मधुकर ठुबे, पत्रकार तेजस ढाकणे, भरत बनकर सर, गायक इमरान शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. वर्धापन दिनाचे औचित्य साधून पत्रकारिता, डिजिटल मीडिया, सामाजिक कार्य, जनहित आणि विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. या गौरवामुळे विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांना नव्या उमेदीने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले. जनतेच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे आणि सामान्य नागरिकांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविणे ही माध्यमांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

बदलत्या माध्यमविश्वाचा वेध घेत दैनिक लोकपरिवर्तनच्या माध्यमातून डिजिटल मीडिया, डिजिटल इंडिया आणि LP News या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. पारंपरिक वृत्तपत्राबरोबरच डिजिटल माध्यमातून बातम्या अधिक वेगाने आणि व्यापक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या दैनिक लोकपरिवर्तनच्या पदाधिकारी, प्रतिनिधी आणि पत्रकारांचेही यावेळी स्वागत करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात कॉ. बाबाजी आरगडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या सामाजिक व वैचारिक परंपरेचा उल्लेख केला. "अहिल्यानगर हा परिवर्तनाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याने परिवर्तनवादी पत्रकार, लेखक, शाहीर आणि लोकनेते घडविले आहेत.

# जलसमृद्धी प्रकल्पाने बदलली : सिन्नर तालुक्यातील शेतीची दिशा!

सिन्नर : (स. गांवकरी)

पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, भूजल पुनर्भरण वाढवणे आणि साठवलेल्या उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, या उद्देशाने जलसमृद्धी प्रकल्पांतर्गत झालेल्या जलसंधारणाच्या परिणामकारक कामांमुळे सिन्नर तालुक्यात शेतीची दिशाच बदलली आहे. काठोकाठ भरलेले नाले, उंचावलेली भूजलपातळी अन् भाजीपाल्याच्या पिकांनी बहरलेला हिरवागार शिवार बघून महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे राष्ट्रीय पातळीवरील पथक प्रभावित झाले. दुष्काळी टापूतील विविध गावांमध्ये जलसमृद्धी प्रकल्पामुळे



विस्मयकारक बदल घडत असून, महिंद्रा कंपनीने यासाठी सीएसआर निधी दिला आहे. 'बायफ' संस्थेच्या माध्यमातून झालेली ही लोकोपयोगी कामे बघून, सीएसआर हेड अविलाश द्विवेदी अत्यंत प्रभावित झाले. सिन्नर तालुक्यातील दुशिंगपूर, देवपूर आणि मळढोण येथे जलसमृद्धी प्रकल्पांतर्गत झालेल्या जलसंधारणाच्या कामांची पाहणी महिंद्रा अँड महिंद्राचे सीएसआर हेड अविलाश द्विवेदी यांनी केली. बायफ लाइव्हलीहूड्स आणि ग्राम विकास समितीच्या कामाचे द्विवेदी यांनी कौतुक केले.

या कामांमध्ये ग्रामस्थांनी घेतलेला उत्स्फूर्त सहभाग, कामांचा दर्जा आणि त्यातून दिसून येणारे सकारात्मक परिणाम पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. स्थानिक गरजा लक्षात घेऊन ग्रामस्थांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

पाणी व्यवस्थापनासाठीचा हा प्रकल्प महिंद्रा अँड महिंद्रा यांच्या सहकार्याने बायफ लाइव्हलीहूड्सच्या माध्यमातून मार्च २०२५ पासून राबविण्यात येत आहे. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, भूजल पुनर्भरण वाढवणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, या उद्देशाने प्रकल्पांतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली आहेत.

२०२५-२६ या वर्षात १६ शेततळी पूर्ण करण्यात आली. त्यापैकी पाच शेततळ्यांसाठी लायनिंग शीट आणि कंपाउंडसाठी मदत करण्यात आली. या शेततळ्यांमधून सुमारे १९५ लाख लिटर पाणीसाठ्याची क्षमता निर्माण झाली असून, १६.२ हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता उपलब्ध झाली आहे. याच वर्षात एका ठिकाणी नाला खोलीकरण व रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. नाला उपचारातून ७६ लाख लिटर अतिरिक्त पाणीसाठा आणि भूजल पुनर्भरणाची क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे १८ हेक्टर क्षेत्र रब्बी सिंचनाखाली आणण्यास मदत झाली आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी ३१ शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच देण्यात आले. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून दरवर्षी सरासरी ३० लाख लिटर पाण्याची बचत होण्याची क्षमता निर्माण झाली आहे. चालू वर्षातही जलसंधारणाची कामे सुरू आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८६ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. ०१ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील १०वी, १२वीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा; परीक्षा शुल्क माफ



**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थितीचा फटका बसलेल्या २६५ तालुक्यांतील इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांकडून आगामी परीक्षेसाठी शुल्क घेण्यात येणार नाही. फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (SSC) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (HSC) परीक्षांसाठी ही सवलत लागू करण्यात आली आहे.

मदत आणि पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचाही समावेश आहे.

या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यातील सर्व विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांची ऑनलाइन आवेदनपत्रे भरून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुढील आदेश मिळेपर्यंत ही कार्यवाही शुल्काशिवाय करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळावा यासाठी संबंधित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने माहिती देण्याच्या सूचना विभागीय मंडळांना देण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जाणार नाही याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले आहे.

दरम्यान, परीक्षा शुल्क माफीबाबतच्या पुढील सविस्तर सूचना राज्य मंडळाकडून स्वतंत्रपणे जाहीर केल्या जाणार आहेत. तसेच दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रांबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळाकडे तातडीने सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## दुष्काळात शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ मच्छिमारांनाही देणार; मंत्री नितेश राणे यांची ग्वाही

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

**२०२८ पासून मुंबईत 'वॉटर मेट्रो' कार्यान्वित करणार**

राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांवरही होतो. महाराष्ट्र हे मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे एकमेव राज्य असून शेतकऱ्यांसाठी घेतले जाणारे निर्णय, लाभ आणि पॅकेज मच्छिमारांनाही लागू होणार आहेत. या संकटातून राज्यातील नागरिकांना बाहेर काढण्यासाठी महायुती सरकार कामाला लागले असून पारंपरिक मच्छिमारांच्या दोन हातांना काम देण्यासाठीही पूर्ण तयारी आहे, अशी ग्वाही राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी दिली. एका हिंदी साप्ताहिकाच्या वतीने मुंबईतील हॉटेल ताजमहाल पॅलेस येथे आयोजित 'सुशासन संवाद' कार्यक्रम अंतर्गत 'छत्रपती संवाद' या सत्रात राणे यांची मुलाखत झाली. या वेळी त्यांनी राज्यातील किनारपट्टी, जलवाहतूक, मच्छिमारांसाठीच्या योजना आणि दुष्काळजन्य परिस्थितीतील मदतीबाबत भूमिका मांडली. मंत्री राणे म्हणाले, २०२८ मध्ये पुन्हा मुंबईत 'सुशासन संवाद' आयोजित केला तर त्या वेळी आज कोस्टल रोडने कार्यक्रमस्थळी पोहोचण्याऐवजी 'मुंबई वॉटर मेट्रो'ने येथे पोहोचता येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून मुंबईच्या संपूर्ण एमएमआर क्षेत्राला वॉटर मेट्रोच्या माध्यमातून जोडण्याची तयारी सुरू आहे.

## माजी अग्निवीरांना राज्यातील गणवेशधारी पदांसाठी विविध सवलती - लेखी, शारीरिक चाचण्यांतून सूट

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

सैन्यदलातील चार वर्षांची सेवा पूर्ण करून सेवामुक्त होणाऱ्या महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांना राज्याच्या गणवेशधारी सेवांमध्ये सामावून घेण्यासाठी राज्य शासनाने विविध सवलती लागू केल्या आहेत.

गृह, राज्य उत्पादन शुल्क, वन आणि नगर विकास विभागांच्या अखत्यारितील गणवेशधारी 'गट-क' संवर्गातील पदांसाठी माजी अग्निवीरांना लेखी परीक्षा, शारीरिक दक्षता चाचणी



आणि शारीरिक मानक चाचणीतून सूट देण्यात आली आहे. तसेच काही सेवांमध्ये कमाल वयोमर्यादेत चार वर्षांपर्यंत शिथिलता देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय बुधवारी जारी केला आहे.

अग्निवीरांच्या चार वर्षांच्या सैन्यसेवेतून मिळालेले शिस्त, नेतृत्व आणि तांत्रिक कौशल्य राज्याच्या सेवेत वापरता यावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन करण्यात आली होती.

या समितीच्या शिफारसीनुसार माजी अग्निवीरांच्या नियुक्तीसंदर्भातील नियमावली निश्चित करण्यात आली आहे.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीत अर्ज विक्रीला वेग
## दिग्गजांनी भरले उमेदवारी अर्ज

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांकडून प्रयत्न सुरू असतानाच उमेदवारी अर्ज खरेदीसाठी इच्छुकांची झुंबड उडाली आहे. उमेदवारी अर्ज विक्रीच्या दुसऱ्या दिवशी तब्बल १७० अर्जांची विक्री झाली. त्यामुळे पहिल्या दिवशी ३६१ असलेली अर्ज विक्रीची संख्या दुसऱ्या दिवशी ५३१ वर पोहोचली आहे.

दरम्यान, राहुरी तालुका विकास सोसायटी मतदारसंघातून भाजपचे आमदार प्राजक्त तनपुरे, महिला राखीव मतदारसंघातून जिल्हा परिषद अध्यक्षा मंजूषा गुंड, तर बिगरशेती मतदारसंघातून धनलक्ष्मी हजारे यांनी प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राजकीय पातळीवर हालचाली सुरू आहेत. मात्र, दुसरीकडे उमेदवारी अर्ज खरेदीसाठी वाढत असलेली गर्दी पाहता बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांसमोर आव्हान निर्माण होण्याची चिन्हे आहेत. गेल्या मंगळवारी अनेक इच्छुकांनी एकाचवेळी एकापेक्षा अधिक उमेदवारी अर्ज खरेदी केल्याचे दिसून आले. त्यामुळे आगामी काळात निवडणुकीतील चुरस वाढण्याची शक्यता आहे.

अर्ज विक्रीची निर्धारित वेळ संपल्यानंतर दुपारी तीन वाजल्यानंतरही काही इच्छुकांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज मिळवून देण्याची मागणी केली. जिल्हा बँकेच्या २१ संचालक पदांसाठी ही निवडणूक होत असून, उमेदवारी अर्ज खरेदी व दाखल करण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे. मतदार यादीत नाव असणे ही उमेदवारी अर्ज खरेदीसाठी आवश्यक अट आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नसलेल्या व्यक्तींना या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आता अंतिम टप्प्यात आली आहे. बुधवारी आणि गुरुवारी उमेदवारी अर्ज खरेदी व दाखल करण्याची संधी उपलब्ध आहे. त्यानंतर शुक्रवार ते रविवार सलग तीन दिवस सुट्ट्या असल्याने इच्छुकांना अर्ज दाखल करण्यासाठी थेट ५ ऑक्टोबरच्या अंतिम मुदतीची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे उर्वरित कालावधीत उमेदवारी अर्ज खरेदी आणि दाखल करण्याच्या प्रक्रियेला आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

गेल्या मंगळवारी माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्रीताई




घुले पाटील, बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम पाटील गायकर, माजी उपाध्यक्ष रामदास वाघ, संचालक प्रशांत गायकवाड, गीतांजली शेळके, पांडुरंग सोले पाटील, घनश्याम शेलार, तसेच प्रमोद राहणे यांनी उमेदवारी अर्ज खरेदी केल्याची माहिती निवडणूक सूत्रांनी दिली.

याशिवाय जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, पारनेरचे वैभव लंके, विजयलक्ष्मी फाळके यांच्यासह अन्य इच्छुकांनीही अर्ज खरेदी केल्याचे सांगण्यात आले.

## राज्यात तीन टप्प्यांत पाणीटंचाईचे नियोजन, १५ ऑक्टोबरपर्यंत जिल्हानिहाय आराखडा सादर करण्याचे निर्देश

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईची तीव्रता वाढल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य टंचाईचा अंदाज घेऊन राज्यात तीन टप्प्यांत नियोजन करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी बुधवारी दिले. ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून या कालावधीसाठी स्वतंत्र आराखडे तयार करून आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि साधनसामग्री उपलब्ध ठेवावी. सर्व जिल्ह्यांचे टंचाई आराखडे १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावेत, तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन आणि जलस्रोत बळकटीकरणाला प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.



छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि पुणे विभागातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या आढावा बैठकीत पाटील बोलत होते. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, अपर मुख्य सचिव पराग जैन नैनुटिया, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तलाव, धरणे, विहिरी आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून त्याचा काटकसरीने वापर करावा.

## चक्रधर स्वामींच्या विचारांतून सशक्त समाज आणि राष्ट्राची निर्मिती : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

मानवी जीवन आणि समाजात विचारांची कमतरता नाही. संत-महात्म्यांचे विचार, संस्कार, मूल्ये आणि सेवाभाव आचरणात आणल्यासच सशक्त समाज आणि राष्ट्राची निर्मिती होऊ शकते, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर (अमरावती) आणि अखिल भारतीय महानुभाव परिषद, अमरावती यांच्या समन्वयाने तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात 'भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सव' आणि एकात्मिक राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करत होते. यावेळी अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष श्री कारंजेकर बाबा, मराठी विद्यापीठाचेअविनाश आवलगावकर,

सांवली मूर्ती मंदिराचे महंत सनातन मुनी शहापूरकर, अहिल्यानगरचे पूनम बाईजी, महंत श्रीवर्धनस्थ बिडकर बाबा रणाइचे,जामोदेकर बाबा, कृतिका शास्त्री, शहापूरकर बाबा, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुलआदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा गौरव करताना श्री. गडकरी म्हणाले की, श्री चक्रधर स्वामींचे विचार व तत्त्वज्ञान समजून घेऊन ते मन, शरीर आणि आत्म्यात रुजविल्यास मानवी जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते. शेकडो वर्षांपूर्वी मानव कल्याणासाठी स्वामींनी मांडलेले विचार आजच्या काळातही समाजनिर्मिती आणि मानवी जीवन सुखी करण्यासाठी तितकेच मार्गदर्शक आहेत.

संत-महात्म्यांचे विचार आणि त्यांचा जीवनमार्ग संघर्षाच्या काळात माणसाला बळ देतात तसेच संकटांचा सामना करण्याची प्रेरणा देतात, असेही त्यांनी सांगितले.

माता-पिता आणि गुरूंकडून मिळणारे शिक्षण, प्रशिक्षण आणि संस्कार हे मुलांच्या भावी आयुष्याची पायाभरणी करतात, असे सांगून श्री. गडकरी म्हणाले की, जसा कुंभार मातीला आकार देतो, त्याप्रमाणे योग्य विचार आणि संस्कारांच्या माध्यमातून मानवी मनाचे परिवर्तन घडवून आणता येते. केवळ सत्ता आणि संपत्तीवर लक्ष केंद्रित न करता समाजातील तळागाळातील नागरिकांच्या जीवनात सुख, समाधान निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या माध्यमातून महानुभाव साहित्य, भगवान श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान तसेच मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या जडणघडणीत महानुभाव वाययाचे योगदान यावर विविध मान्यवर, साहित्यिक, अभ्यासक आणि तज्ज्ञांनी विचार मांडले. चर्चासत्रात सहभागी वक्त्यांनी महानुभाव साहित्याची समृद्ध परंपरा, त्याचे भाषिक व सांस्कृतिक महत्त्व आणि समकालीन संदर्भातील उपयुक्तता यावर प्रकाश टाकला. सुत्रसंचलन गौरव व्यास यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्र सदनात आयोजित महानुभाव पंथाच्या ग्रंथप्रदर्शनाची पाहणी केली. या प्रदर्शनात महानुभाव पंथाचा इतिहास, भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे जीवनकार्य, तत्त्वज्ञान तसेच महानुभाव साहित्याची समृद्ध परंपरा यांची माहिती देणारे विविध ग्रंथ आणि साहित्य प्रदर्शित करण्यात आले होते. श्री. गडकरी यांनी




प्रदर्शनाची पाहणी करून संबंधितांकडून ग्रंथ व साहित्याविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी समन्वयक हरिहर पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात भगवान श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनचरित्र व विचारांवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भक्तिसंगीत तसेच परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, अभ्यासक, महानुभाव पंथाचे अनुयायी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### रोहित शर्माचा वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना दणका, शतकी खेळीसह वर्ल्डकपसाठी ठोकला दावा

वेस्ट इंडिजने दुसऱ्या वनडे सामन्यात भारताला ४०५ धावांचं मोठं आव्हान दिलं आहे. या धावांचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांना आक्रमक सुरूवात करण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा कशी सुरूवात करतात याकडे लक्ष लागून होतं. मागच्या सामन्यात शुभमन गिलने शतक ठोकलं होतं.पण रोहित शर्मा ३२ धावा करून बाद झाला होता. त्यामुळे या सामन्यात रोहित शर्माकडून फार अपेक्षा होत्या. त्या अपेक्षा रोहित शर्माने खऱ्या करून दाखवल्या. विजयी धावांचा पाठलाग करताना रोहित शर्माने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडलं. समोर जो गोलंदाज येईल त्याला दणका दिला. रोहित शर्माने अर्धशतकी खेळीत ६ चौकार आणि ४ षटकार मारले.रोहित शर्माने अवघ्या ३२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. यानंतर रोहित शर्माचा झंझावात हा सुरूच होता. रोहित शर्माने ७२ चेंडूत १० चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १०० धावा पूर्ण केल्या. यावेळी त्याने १३८.८९ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या.

### 'हनुमान अंश'च्या निर्मात्यांचं कौतुक 'मैंने तेरे ही भरोसे हनुमान' गाण्याच्या दृष्टीहीन गायकासाठी घेतला मोठा निर्णय

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

आध्यात्मिक गुरू नीम करौली बाबा यांच्या जीवनावर आधारित असलेल्या 'हनुमान अंश' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर इतिहास रचला. अवघ्या १.५ कोटी ते २ कोटीच्या बजेटमध्ये तयार झालेल्या ह्या चित्रपटाने दीड महिन्यामध्ये ४०८ कोटींचा गल्ला जमावला आहे. चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य तर गाजवले आहे, पण गाण्यांनीही प्रेक्षकांवर भुरळ घातली आहे. चित्रपटातील 'मैंने तेरे ही भरोसे हनुमान' आणि ' पार्वती' गाण्याने प्रेक्षकांवर भुरळ घातली आहे. सोशल मीडियावर स्क्रोल करताना या गाण्यांचे अनेक रिल आपल्याला पाहायला मिळतात. 'मैंने तेरे ही भरोसे हनुमान' गाण्याच्या सिंगरने आपल्या आवाजाने प्रेक्षकांना आपलंसं केलं आहे. या गायका संबंधित एक महत्त्वाची बातमी आहे.

### कृत्रिम तलावांमध्ये तब्बल ९७ टक्के गणेश मूर्तींचे विसर्जन

**मुंबई महानगरपालिकेचा दावा**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबईकर श्रीगणेशभक्त आणि श्रीगणेश मंडळांनी उदंड प्रतिसाद देत तब्बल ९७.२७ टक्के श्रीगणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन केले असल्याचा दावा मुंबई महापालिका प्रशासनाने केला आहे. महानगरपालिका प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या ३८३ कृत्रिम तलावांमध्ये हे विसर्जन करण्यात आले. ही पर्यावरणपूरकता जपण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल सर्व श्रीगणेशभक्तांचे मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी आणि महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी आभार मानले आहे.

### कर्णधार शुभमन गिलचा डबल धमाका, वेस्ट इंडिजविरुद्ध सलग दुसऱ्या सामन्यात ठोकलं शतक

भारताचा कर्णधार शुभमन गिल याने ४०५ या धावांचा पाठलाग करताना कर्णधारपदाला साजेशी खेळी केली. त्याने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडलं. वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत सलग दुसरं शतक ठोकलं. त्याची शतकी खेळी पाहून जबरदस्त फॉर्मात असल्याचं दिसून येत आहे. शुभमन गिलने ६२ चेंडूत १० चौकार आणि ५ षटकारांचया मदतीने १०० धावा केल्या. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट हा १६१.२९ चा होता. शुभमन गिलला रोहित शर्माची साथ लाभली. या दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी २००हून अधिक धावांची भागीदारी केली. ही जोडी आणखी टिकली तर आरामात ४०५ धावांचा पल्ला टीम इंडिया गाठू शकते.

# आ.सत्यजित तांबे यांच्याकडून संगमनेर एमआयडीसी साठी पाठपुरावा

■ पठार भागात एम आयडीसीसाठी सर्वेक्षण लवकरात लवकर करा – आमदार तांबे
■ मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विकास, दूध व्यवसाय, सहकार आणि शिक्षण आणि सततची विकास कामे या माध्यमातून राज्यासाठी मार्गदर्शक ठरलेल्या संगमनेर तालुक्यात नव्याने एमआयडीसीच्या माध्यमातून अधिक रोजगार उपलब्ध निर्मितीसाठी आमदार सत्यजित तांबे यांनी उद्योग मंत्री व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला असून साकुर पठार भागातील एमआयडीसीसह सहकारी एमआयडीसीच्या विविध प्रश्नांबाबत त्यांनी चर्चा केली. तसेच लवकरात लवकर सर्वेक्षण पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करा अशी मागणी त्यांनी केली.

मुंबई येथे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी देपेंद्रसिंह कुशावह व अहिल्यानगर येथील एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी आमदार सत्यजित तांबे यांनी साकुर पठार भागामध्ये एमआयडीसी साठी लवकरात लवकर सर्वेक्षण व्हावे पाणीपुरवठ्याचे नियोजन व्हावे याबाबत चर्चा केली.

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून भौगोलिक दृष्ट्या पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव भाग अशी तीन विभाग पडतात. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर संगमनेर तालुक्याचे वाटचाल सुरू असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विकास, दूध व्यवसाय, शिक्षण, सहकार या माध्यमातून तालुक्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाली आहे. शांतता, सुव्यवस्था ही संगमनेर तालुक्याचे वैशिष्ट्य असून माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण, नाशिक पुणे हायवे, शहरासाठी थेट पाईपलाईन योजना, विविध वैभवशाली इमारती, प्रत्येक गावामध्ये विकासाच्या योजना, नद्या ओढे यांच्यावर सिमेंट बांधारांचे जाळे निर्माण करून तालुक्याची प्रगती साधली.

याचबरोबर सहकारी एमआयडीसीमध्ये सुमारे १८० विविध व्यवसाय असून त्या माध्यमातून ५००० नागरिकांना रोजगार मिळाला आहे. तालुक्यात नव्याने शासकीय एमआयडीसी व्हावी याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

आमदार सत्यजित तांबे यांनी मुंबई येथे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्रसिंह कुशावह व अहिल्यानगर जिल्ह्यातील एमआयडीसी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन साकुर, बोटा, पठारभाग परिसरामध्ये लवकरात लवकर सर्वेक्षण पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी याबाबतच्या सूचना केली अशी मागणी ही केली.तसेच संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहती मधील विविध प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी उद्योग विभागाने तातडीने मदत करावी अशी मागणी ही आमदार सत्यजित तांबे यांनी केली असून या बैठकीच्या माध्यमातून एमआयडीसीच्या कामाला गती मिळेल व सहकारी औद्योगिक वसाहत मधील प्रश्न सोडवण्यासाठी ही उद्योग विभाग मदत करेल असे आश्वासित करण्यात आले आहे.

**श्री. पांडुरंग पोपटराव राऊत**
**ॲडव्होकेट**
लॉयर्स चेंबर नं. १८, कोर्टाजवळ, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे, मोबा ९८२२१०७२०९

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टातील नमूद मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आशिष विजयकुमार पुंगलिया व श्री अभिजित दिनेशकुमार समदडीया रा. मंचर ता. आंबेगाव, जि. पुणे यांनी आमचे अशिलांस सदर मिळकत विकसीत करण्यासाठी देण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याबद्दल त्यांनी खात्री व भरोसा दिला आहे. तथापि सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, अन्न–वस्त्र–निवारा, साठेखत, करार, कुलमुखत्यार अगर तत्सम स्वरूपाचा काहीही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन आठ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर अस्सल कागदपत्रांनीशी आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर आमचे अशील पुढील व्यवहार करतील व नंतर कोणाचीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :– तुकडी पुणे पोटतुकडी ता. आंबेगाव येथील मा. दुय्यम निबंधक साो घोडेगाव यांचे हद्दीतील व गाव मौजे मंचर येथील बिगरशेत जमीन मिळकत सर्व्हे नं. २६/११+१२/२ क्षेत्र ०० हेक्टर ३७ आर, आकार ०० रु. १६ पैसे. यांसी चतुःसिमा :– पूर्वेस – जुना पुणे नाशिक रस्ता, दक्षिणेस – सर्व्हे नं. १३, पश्चिमेस – सर्व्हे नं. २६, उत्तरेस – हिस्सा नं. ११+१२/१ येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाची मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

**राजगुरुनगर** **आमचे अशिलांतर्फे**
**दिनांक :– २९/०९/२०२६** **ॲडव्होकेट**

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर.✆:०२४१-२३२६९१४

**जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /११२१/ सन २०२६** **दिनांक -१७/०९/२०२६**

**स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,जामखेड.ता.जामखेड,जि.अ.नगर.** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत<br>वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा<br>पुर्व / पश्चिम / दक्षिण / उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्ज - भागचंद चुन्नीलाल नवलाखा करिता | | २३३५३५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | |
| | संमती -अनिरुद्ध सुर्यकांत बरबडे यांची मिळकत | जामखेड<br>ता.जामखेड | | मा.क्र.१२४० | ४८.०८ चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - हिरालाल भागचंद नवलाखा | | | | | | |
| | जामि-सुवर्णा कांतीलाल खिवसरा | | | | | | |
| २. | कर्ज - विलास भगवान जाधव यांची मिळकत व करीता | खर्डा | १०५२९३/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | मा.क्र.३९० मालमत्तेचे वर्णन २२*१६ व २२*११.५ यात वीट सिमेंट पत्रे बांधकाम | ३३.७२ चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि -मधुकर पांडुरंग गोलेकर यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | १८४ | २.००.०० | ४.४७ | |
| | जामि -बाबसाहेब सोपान मोरे | | | | | | |
| ३. | कर्ज- मधुकर पांडुरंग गोलेकर यांची मिळकत व करिता | खर्डा<br>खर्डा | १५२३४५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | १७८<br>१८४ | १.७०<br>२.६४ | १.९७<br>५.९१ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - मनोज नारायण जोरे यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | | १५१<br>१६८/२ | ०.४३<br>०.८१ | ०.१६<br>०.८२ | |
| | जामि - राजेश गोपाळराव गोलेकर | | | | | | |
| ४. | कर्ज- संतोष गोविंद साबळे करिता | | १४८७३५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | |
| | संमती- गोविंद मारुती साबळे यांची मिळकत | खर्डा | | मा.क्र.१४६१ मालमत्तेचे वर्णन २१.५*१८.५ आर सी सी इमारत २८*१८.५ यांत विट सिमेंट पत्रे बांधकाम | ३६.९५ चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | | खर्डा<br>ता.जामखेड | | मा.क्र.१४६१ मालमत्तेचे वर्णन २१.५*१८.५ आर सी सी इमारत २८*१८.५ यांत विट सिमेंट पत्रे बांधकाम | ४८.१२ चौमी | - | |
| | जामि- भरत जिव्हारी गोलेकर | | | | | | |
| | जामि-शिवदास बलभिम कोरे | | | | | | |
| ५. | कर्ज - नवनाथ रघुनाथ भोसले यांची मिळकत व करीता | खर्डा | १७८९७१/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | मा.क्र.१४/६ मालमत्तेचे वर्णन १६.५*११.५ यांत आर सी सी.बांधकाम | १७.६३ चौमी | - | |
| | | खर्डा | | ४४१ | १.०७ | ०.८९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - आसाराम गोवर्धन अंधाळकर यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा | | ११४४<br>११४५<br>११४६<br>११७३/२ | ०.७०<br>०.२८<br>०.४१<br>०.२७ | ०.७०<br>०.८६<br>१.२०<br>०.९४ | |
| | जामि- संभाजी रगुनाथ भोसले यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | ४९२ | ०.४०.०० | ०.२२ | |
| ६. | कर्ज - एकनाथ विश्वनाथ शिंदे यांची मिळकत व करिता | खर्डा | १४३२६७/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | ४१९ | ०.७२ | १.७३ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - उध्दव मुरलीधर ढेरे यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | | ५४६/२<br>५६६ | ०.५२<br>०.२१ | १.९०<br>०.२१ | |
| | जामि- सत्तार पापा मामीन | | | | | | |
| ७. | कर्ज - गोकुळ पांडुरंग ढेरे यांची मिळकत व करिता | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा | १३०१२५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | ५४४<br>५६८/१<br>५६९<br>६२० | ०.०१.३४<br>०.५५<br>०.८१<br>०.०७ | ०.०१<br>०.४८<br>०.७५<br>०.०७ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - उध्दव मुरलीधर ढेरे यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | ४३५ | २.३१ | १.९३ | |
| | जामि- शिवाजी बाळा ढेरे | | | | | | |
| ८ | कर्ज - राजु रघुनाथ भोसले यांची मिळकत व करिता | खर्डा<br>खर्डा | १०३६१०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | ५२९<br>५७१ | ०.२६<br>०.९४ | ०.६६<br>- | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - आसाराम गोवर्धन आंधकर यांची मिळकत | खर्डा | | ११४३ पैकी | ४.०४ पैकी<br>पो.ख .१.३५.०० | २.५९ | |
| | | खर्डा<br>खर्डा | | ११४४ पैकी<br>११४६ | ०.७० पैकी<br>०.४१.००<br>पो.ख ०.०१.०० | ०.७०<br>१.२० | |
| | | खर्डा | | ६५५ | ०.१८ | ०.२७ | |
| | संमती- शेषराव रघुनाथ भोसले यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | मा.क्र.१४/२ मालमत्तेचे वर्णन १६*११.५ यात आर सी सी इमारत बांधकाम | १७.०९ चौमी | - | |
| ९ | कर्ज -रामचंद्र जनार्धन पेडगावकर करिता | | ९६२२८६/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - प्रकाश लक्ष्मण दिंडोरे यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा | | १४४<br>८८/३ | ०.८०<br>१.८० | ०.४२<br>१.८९ | |
| | जामि- सचिन प्रविण मेहता यांची मिळकत | खर्डा | | नगर भु क्र.४७६ | २३५.१० चौमी | - | |
| | संमती-यशोदिप रामचंद्र पेडगावकर यांची मिळकत | खर्डा | | ६८ | १.९२ | १.२९ | |
| | संमती-रोहित रामचंद्र पेडगावकर यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | मा.क्र.१५९१ मालमत्तेचे वर्णन २५*११ यात आर सी सी एक मजली इमारत पत्रे बांधकाम | २५.५५ चौमी | - | |
| १०. | कर्ज - जनार्धन एकनाथ पेडगावकर/पडेगावकर [मयत] हिरालाल जनार्धन पेडगावकर यांची मिळकत व करिता | खर्डा | १८२०८५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | नगर भु.क्र.८३९ | १३१.०० चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | वारस - पेडगावकर हिरालाल जर्नाधन यांची मिळकत | जामखेड<br>ता.जामखेड | | मा.क्र.८५२ मालमत्तेचे वर्णन २६*१५ यात विट सिमेंट पत्रे बांधकाम | ३६.२३ चौमी | - | |
| | जामि- रामभाऊ जनार्धन पेडगावकर | | | | | | |
| | जामि- प्रकाश लक्ष्मण दिंडोरे | | | | | | |
| | वारस-रामचंद्र जनार्धन पेडगावकर | | | | | | |
| | वारस-अनिल जनार्धन पेडगावकर | | | | | | |
| | वारस-सुनिल जनार्धन पेडगावकर | | | | | | |
| ११ | कर्ज - चंद्रकांत सुबाराव म्हस्कर यांची मिळकत व करिता | खर्डा | १४८०८६१/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | मा.क्र. २३२० मालमत्ता वर्णन १५*१२ यात आर सी.सी दोन मजली इमारत बांधकाम | ५५.७४ | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामि - दत्तात्रय बाजीराव बिरंगळ यांची मिळकत | सोनेगाव<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | | १०८/१/ब<br>६९१/२<br>९१९ | १.२८<br>०.०१<br>०.०१.५० | २.७४<br>०.०१<br>०.०१ | |
| | जामि- हरिदास माणिक केसकर यांची मिळकत | जेकटेवाडी<br>ता.परांडा<br>जि.धराशिव | | ३/१ | ०.८८.०० | ०.७१ | |
| १२. | कर्ज - अरुण मोहन लोंढे यांची मिळकत व करिता | खर्डा | १२३४१५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | मा.क्र.१२६ पैकी मालमत्तेचं वर्णन २८*२६ व २८*१३ यात आर सी सी इमारत बांधकाम | १०१.४५ चौमी पैकी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| | वारस - सरस्वती अरुण लोंढे यांची मिळकत | खर्डा | | ४३० पैकी | ०.४०.०० पैकी | ०.५३ | |
| | जामि- सुनिल पांडुरंग लोंढे यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा | | ४३२ पैकी<br>४३८ | ०.४९ पैकी<br>०.९० | ०.८२<br>१.३२ | |
| | जामि- सत्तार पापा मोमीन यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | | १३४<br>१३५ | ०.०८<br>०.०८ | ०.१५<br>०.१८ | |
| १३. | कर्ज - गळवे सुभाष शांतीलिंग करिता | | २२२३४१/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे |
| | संमती - शांतीलिंग केदारी नंदुर्गे यांची मिळकत | जवळा | | मा.क्र.५४३/४ मालमत्ता वर्णन इतर पक्के घर [दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर [लांबी १०*रुंदी ३७] | ३७० चौमी पैकी | - | |
| | जामि- दिललप रामलिंग धावड यांची मिळकत | जवळा<br>ता.जामखेड | | १२७ पैकी | ४.०९.०० पैकी<br>पो.ख ०.०३.०० | ४.०७ | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -१७/०९/२०२६

सिल

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.
फेडरेशन मर्या,अ.नगर

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## कावेरी घोलप यांचा सन्मान राजमाता जिजाऊ पुरस्काराने समाजभूषण



**राजूर (समर्थ गांवकरी)**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सन्माननीय श्रीपाल सबनीस साहेब यांच्या हस्ते, मान्यवरांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील श्रीमती कावेरी दिनेश घोलप यांना 'राजमाता जिजाऊ समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. हा पुरस्कार संगीत, शिक्षण, कला, साहित्य, सामाजिक कार्य, आरोग्य, उद्योग, पर्यावरण आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत कावेरी घोलप यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. रानकवी प्रतिष्ठान व ज्ञानाई फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १०० वे राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलन महात्मा फुले सांस्कृतिक भवन, प्रतिमा नगर, पुणे येथे संपन्न झाले. याच कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कावेरी घोलप यांच्या सामाजिक व विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## अकोले तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत ब्राम्हणवाडा विद्यालयाचा प्रथम क्रमांक!



**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले येथे अभिनव पब्लिक स्कूलमध्ये तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धा २०२६-२७ उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या सह्याद्रि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्राम्हणवाडा येथील १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या विजयानंतर संघाची श्रीगोंदा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी संघातील खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक वाय. व्ही. देशमुख, प्रा. अमित सहाणे, शांताराम मंडलिक, सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक शांताराम साबळे, अलीम तांबोळी, शिवाजी आरोटे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या यशाबद्दल विद्यालय परिसरातून त्यांचे अभिनंदन होत असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. विजयी संघाचे प्राचार्या शेलार मॅडम, पर्यवेक्षक प्रा. जे. आर. हासे, श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरी श्रीमती शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीषजी नाईकवाडी, सतीशजी नाईकवाडी व संदीपजी नाईकवाडी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## देशातील दुसऱ्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन'ला मंजुरी,

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. देशातल्या दुसऱ्या स्लीपर वंदे भारत ट्रेनला मंजुरी मिळाली आहे. ही हायस्पीड स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस वाराणसी ते नवी दिल्ली स्थानकादरम्यान धावणार आहे. या ट्रेनला कानपुर सेंट्रल आणि प्रयागराज अशा दोन स्थानकांवर थांबा असणार आहे. या स्पेशल हायस्पीड ट्रेनमुळे पुर्वांचल, मध्य उत्तर प्रदेश आणि कानपूर या परिसरातील प्रवाशांना दिल्ली आणि वाराणसी दरम्यान प्रवास करण्यासाठी प्रवाशांना एक नवीन पर्याय उपलब्ध होणार आहे.

प्रस्तावित वेळापत्रकानुसार, वंदे भारत स्लीपर ट्रेन वाराणसी स्थानकावरून रात्री ८.४० वाजता सुटेल, रात्री १०.०५ वाजता प्रयागराजला, रात्री ११.५० वाजता कानपूर सेंट्रलला पोहोचेल. त्यानंतर ही ट्रेन पहाटे सुमारे ४.५० वाजता नवी दिल्लीत पोहोचेल. वाराणसी ते दिल्ली या प्रवासाला अंदाजे ८ तास १० मिनिटांचा अवधी लागण्याची शक्यता आहे. परतीच्या प्रवासासाठी ही ट्रेन नवी दिल्ली स्थानकावरून रात्री ११.२५ वाजता सुटेल. ती कानपूरला मध्यरात्री ३.३० च्या सुमारास आणि प्रयागराजला पहाटे ५.३८ वाजता पोहोचेल. त्यानंतर ट्रेन सकाळी ७.३५ च्या सुमारास वाराणसीला पोहोचण्याची शक्यता आहे.

## दुबई- तेल अवीव विमान हायजॅक नाहीच! तर विमानात भलतच घडलं; अखेर सत्य आलं समोर

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

दुबईहुन तेल अवीव विमानासंबंधित एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. 'फ्लाय- दुबई' कंपनीच्या विमानामध्ये अचानक अपहरण झाल्याची माहिती मिळाल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगलीच खळबळ उडाली आहे. सौदी अरेबिया प्रांतामध्ये असताना विमानाने अचानक आपली दिशा बदलली, त्यामुळे सुरक्षा यंत्रणाची चांगलीच धावपळ उडाली. पण, या प्रकरणामध्ये आता महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. नेमकं काय आहे प्रकरण, जाणून घेऊया... 'फ्लाय- दुबई' कंपनीच्या विमानामध्ये जे, दुबईवरून तेल अवीवला जात होते. विमानातील कॉकपिटमध्ये असलेल्या एका वैमानिकाला ते विमान क्रॅश करायच्या विचारात होता. पण दुसऱ्या वैमानिकाने त्याला तसं काही करू दिलं नाही.

# हिवरगाव पावसा येथे नुकसानग्रस्त भागाची काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्याकडून पाहणी

### शेतकऱ्यांना तातडीने भरघोस मदत मिळाली पाहिजे : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला मदतीची अत्यंत गरज आहे. याचबरोबर अचानक आलेल्या पावसाने हिवरगाव पावसा येथे मोठे नुकसान झाले असून आता पंचनामे न करता या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याबरोबर राज्यातील सर्व शेतकऱ्यांना संकट काळात मदत करा अशी मागणी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

हिवरगाव पावसा येथे अचानक आलेल्या पावसाने शेडनेट कागद व घरांची मोठी नुकसान झाली या नुकसानीची मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पाहणी केली यावेळी समवेत डॉ. प्रमोद पावशे, डॉ. संदीप पावशे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

काल अचानक आलेल्या पावसाने हिवरगाव पावसामध्ये शेतकऱ्यांच्या विविध पिकांसह शेडनेट कागद , घरांचे पत्रे व कौले यांची नुकसान झाले यामुळे आधीच आर्थिक अडचणी सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी दिलासा दिला.

यावेळी ते म्हणाले की यावर्षी १९७२ पेक्षाही भयानक दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. आता तातडीने





उपाययोजना करण्याची गरज आहे कारण राज्यामध्ये पशुधन मोठे आहे. पाणी व्यवस्थापन केले पाहिजे. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंचनामे न करता तातडीने मदत दिली पाहिजे. दुष्काळग्रस्त सर्व शेतकऱ्यांना एकरी मदत देताना कोणत्याही पंचनामा नको सरसकट आणि मोठी मदत द्या जेणेकरून अशा संकट काळामध्ये शेतकरी उभा राहील.

शेतकरी मोठ्या कष्टातून पीक उभे करतो मात्र पावसा अभावी पिके वाया गेली आहेत. काही भागांमध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या केले आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे शेतकऱ्यांनी ही अशा संकट काळामध्ये ठाम उभे राहावे याचबरोबर राज्यातील सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्याबरोबर सरकारने शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत करावी अशी मागणी मा महसूल बाळासाहेब थोरात यांनी यावेळेस केली आहे. मा. कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या भेटीनंतर सदर नागरिक व शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

# आनंद नागरी पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

### सभासदांना १५ टक्के लाभांश; दिवाळीसाठी दहा किलो साखर व दोन किलो खाद्यतेल देणार; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील आनंद नागरी सहकारी पतसंस्थेची सन २०२५-२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश शेठ भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली बालाजी मंगल कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली. यावेळी सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दिवाळीनिमित्त प्रत्येक सभासदाला दहा किलो साखर व दोन किलो खाद्यतेल देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

सभेच्या निमित्ताने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव व बक्षीस वितरण सोहळाही उत्साहात पार पडला. गेल्या सुमारे तीस वर्षांपासून संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराची परंपरा सुरू आहे. या उपक्रमातून सभासदांच्या पाल्यांना शैक्षणिक क्षेत्रात प्रोत्साहन मिळत असून,




गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या माध्यमातून गौरव केला जात आहे.

संस्थेचे उपाध्यक्ष चंदूकाका कटरिया यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. सभेच्या प्रारंभी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संस्थेचे सचिव सुभाष तरटे यांनी वाचून दाखविले. त्यानंतर संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाची तसेच सभेपुढे ठेवण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती देण्यात आली.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक जमाखर्च, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व व्यापारी पत्रके सभेपुढे वाचून मंजुरीसाठी ठेवण्यात आली. तसेच सन २०२६-२७ साठी दिनांक ३१ मार्च २०२६ रोजीचा शासकीय लेखापरीक्षण अहवालाचेही वाचन करण्यात आले.

# जगभरात भारतीय संविधानाची चर्चा - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई/गुवाहाटी (समर्थ गांवकरी)**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कर्तृत्व हिमालयाहून उंच आभाळ व्यापणारे आहे.त्यांनी देशाला दिलेले संविधान लोकशाही मजबूत करणारे आहे.संपूर्ण जगात भारतीय संविधानाच्या गौरवाची चर्चा आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.आसाम मधील धुबुरी जिल्ह्यातील छापर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन चे उद्घाटन ना. रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन ची निर्मिती ना.रामदास आठवले यांनी केलेल्या प्रयत्नामुळे झाली आहे. या डॉ.आंबेडकर भवन साठी आसाम सरकार ने १कोटी ९५ लाख रुपये ना.रामदास आठवले यांनी केलेल्या प्रयत्नामुळे मंजूर झाले आहेत.या



सामाजिक भवन मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा उभारण्यात आलेला आहे.तिथे ना. रामदास आठवले यांनी पुष्पांजली वाहून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर संस्कृतिक सामाजिक भवन मध्ये ग्रंथालय वाचनालय सभागृह उभारण्यात आलेले आहे. या उद्घाटन सोहळ्यात ना. रामदास आठवले यांच्या समवेत विनोद निकाळजे; आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल १९७५ च्या बॅचचा तब्बल ५२ वर्षांनंतर स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूलच्या १९७५ च्या बॅचचा स्नेह मेळावा डीएसपी चौक,हॉटेल पंचवाटीका येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.तब्बल ५२ वर्षांनंतर जुने वर्गमित्र,मैत्रिणी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.याप्रसंगी बालमित्र व मैत्रीणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्नेह मेळाव्याच्या सुरुवातीला गेल्या ५२ वर्षात दिवंगत झालेल्या जुन्या मित्र-मैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत, प्रतिज्ञा व शाळेतील प्रार्थना सौ रंजना पारखे, अंजली इनामदार भिसे, दीपा भालेराव देव यांनी म्हटली.

प्रास्ताविक करताना लक्ष्मीकांत झंवर म्हणाले की, १९७५ साली आपण शाळेच्या बाकावरून बाहेर पडलो आणि आज ५२ वर्षांनी पुन्हा त्याच बाकावर



बसल्यासारखे वाटत आहे.या मेळाव्याचा उद्देश केवळ एकत्र येणे नाही तर आपल्या शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा आहे.ज्या शाळेने आणि शिक्षकांनी आपल्याला घडवले त्यांची आयुष्यभर आठवण रहावी म्हणून सर्व मित्रांच्या सहकार्याने हा मेळावा होत आहे.

या स्नेह मेळाव्याला लक्ष्मीकांत झंवर,डॉ.पारस कोठारी,ज्ञानेश्वर रासकर, राजेंद्र देव,मिलिंद गांधी,सुधीर झालानी,दिपक खिस्ती, श्रेणिक कांकरिया,राजेंद्र मेहेर,ओम प्रकाश खंडेलवाल, विनायक कुलकर्णी,उपेंद्र कुलकर्णी,सुधीर खेर,प्रदीप कोठारी,प्रकाश देसरडा,प्रमोद राठोड,वाजीदीन इनामदार, प्रकाश गुंदेचा, अनिल आहेर, सुभाष खत्री,नितीन नागुलपेल्ली, रंजना पारखे,अंजली इनामदार, जयश्री कटरिया, महेंद्र चंदे,दशरथ गाडळकर, सुधाकर धोरपडे, गणेश भालेराव,जगन्नाथ बहिरवाडे, प्रदीप भंडारे,बजरंग भुतारे, सावळेराम गुंजाळ, रत्नाकर डोळसे, संजय गाडिलकर, मोहन फुलडहाळे, रामचंद्र जिंदम,शिवाजी सानप,सतिष सुरपुरिया, अशोक खंडेलवाल,अर्चना गांधी,श्रीकृष्ण जोशी,रमेश भोजवाणी,अजीत ताथेड, दिपा भालेराव, कमलाकर पाठक,मोरेश्वर मुळे,डुंगरवाल आदी उपस्थित होते.

# समानतेचा विचार मनात रुजला, तरच सुरक्षित समाजाची पायाभरणी!

### पारनेर महाविद्यालयात 'लैंगिक समानता व संवेदनशीलता' कार्यशाळा उत्साहात

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ कायदे, अधिकार आणि घोषणांपुरता मर्यादित न राहता तो प्रत्येकाच्या दैनंदिन वर्तनाचा भाग होणे आवश्यक आहे. समोरच्या व्यक्तीच्या हक्कांसोबतच तिच्या भावना, स्वाभिमान आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करण्याची मानसिकता विकसित झाली, तरच खऱ्या अर्थाने सुरक्षित आणि समताधिष्ठित समाज निर्माण होईल, असे प्रतिपादन डॉ. ऋत्विज म्हस्के-खिलारी यांनी केले.

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षाच्या वतीने 'लैंगिक समानता आणि संवेदनशीलता' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन




करण्यात आले होते. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. म्हस्के-खिलारी यांनी लैंगिक समानतेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. समाजाचा समतोल आणि विकास हा स्त्री-पुरुषांच्या समान सहभागावर अवलंबून आहे. समानतेकडे केवळ हक्क अथवा अधिकार म्हणून न पाहता ती आपल्या विचारसरणीचा आणि सामाजिक वर्तनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे. दैनंदिन जीवनात एकमेकांच्या भावना आणि अधिकारांची जाणीव ठेवणे ही आजची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिला सक्षमीकरण कक्षाच्या सदस्या प्रा. ज्योत्स्ना म्हस्के यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लैंगिक समानतेची सुरुवात घरापासूनच झाली पाहिजे. मुलगा आणि मुलगी असा भेद न करता दोघांनाही समान संधी, शिक्षण आणि संस्कार मिळाले पाहिजेत.

# राहुरीतील या शासकीय कार्यालयांचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते व्हावे !! पण.....

**राहुरी (समर्थ गांवकरी)**

राहुरी शहरासह तालुक्याला संकट, समस्या, अडचणी या पाचवीला पुजलेल्या असल्या तरी सध्या राहुरीत एका विषयाची चर्चा सुरू आहे. राहुरी तालुक्यात काही शासकीय विभागांचे इमारतींचे काम अंतिम टप्प्यात असून काही शासकीय कार्यालयांचे काम प्रगतीपथावर दिसून येत आहे.

राहुरी शहरासह तालुक्यातील अनेक रस्त्यांच्या कामाला ब्रेक लागलेला दिसत आहे . उशिरा का होईना नगर - कोपरगाव राष्ट्रीय महामार्गाचे कामही प्रगतीपथावर दिसून येत आहे . राहुरीतील खराब रस्त्यांना सर्वांना सामोरे जावे लागत आहे .

मात्र एक समाधानाची बाब नागरिकांमध्ये चर्चेत आली आहे . ती म्हणजे सध्या काही प्रमुख शासकीय इमारतींच्या नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले असून काही शासकीय विभागाचे काम प्रगतीपथावर आहेत.

(नियोजित राहुरी पोलीस स्टेशनची भव्य इमारत)

राहुरी तालुक्याच्या सुरक्षेची जबाबदारी असणारे राहुरी पोलीस स्टेशनच्या इमारतीचे काम शहरातील सौ. भागीरथीबाई तनपुरे कन्या विद्यालया समोर सुरू असून ते सध्या अंतिम टप्प्यात असल्याचे चित्र दिसत आहे . या ठिकाणी अद्ययावत पोलीस स्टेशन इमारतीत वेगवेगळे विभाग असतील . पोलीस अधिकारी केबिन, विविध बीट चे कक्ष, मॅजिस्ट्रेट कस्टडी रूम , गोपनीय कक्ष , चौकशी कक्ष , फिर्यादी कक्ष, महिला कक्षासह सायबर क्राईम कक्षासह पोलीस स्टेशन इमारत असेल असे सांगण्यात येते.

(नियोजित पशुवैद्यकीय चिकित्सालय इमारत - राहुरी )

राहुरी पोलीस स्टेशन लगत पशुवैद्यकीय चिकित्सालय इमारतीची काम ही पूर्ण झालेले आहे. मात्र ते उद्घाटनाच्या




राहुरी पशुवैद्यकिय चिकित्सालय



राहुरी पोलीस स्टेशन



वन्यप्राणी उपचार केंद्र

प्रतीक्षेत असल्याचेही चित्र दिसत आहे . या इमारतीत शेतकऱ्यांच्या जनावरांची तपासणी , विविध पशुवैद्यकीय अधिकारी कक्ष , असे वेगवेगळे कक्ष असतील असेही सांगण्यात येते .

( नियोजित राहुरी एस टी बस स्टॅन्ड चे आवार)

राहुरी बस स्थानक - राहुरी बस स्थानकाचे इमारतीचे कामही ७० टक्क्यांपेक्षा अधिक झाल्याचे चित्र दिसून येत असून आहे या बस स्थानकाच्या अंतर्गत इमारत विविध कक्ष , प्लॅटफॉर्म , भव्य शेड, चालक वाहक कक्ष चे काम अंतिम टप्प्यात असून प्लॅटफॉर्म व पुढील काही तयारीचे काम सुरू आहे .

( वन्य प्राणी उपचार केंद्र व निवारा केंद्र - राहुरी )

राहुरी तालुक्यातील डिग्रस येथील वनविभागाच्या रोपवाटिके नजीक वन्यप्राणी उपचार केंद्र व निवारा केंद्राचे काम देखील अंतिम टप्प्यात असून या वन्यप्राणी उपचार केंद्र व निवारा केंद्रात चार आणि दोन तृणभक्षक आणि वन्यजीव व पक्षी यांचे निवारा केंद्र असेल . यातील काही ठिकाणी दिवस - रात्र नैसर्गिक अधिवासामध्ये राहिल्यासारखे या वन्यप्राणी पशु - पक्ष्यांना वावरता येणार आहे , अशी माहिती समोर आली आहे . वन विभागाचा वन्यप्राणी उपचार केंद्र व निवारा केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे .

राहुरी शहरातील सर्वात बिकट व चर्चेत असणारा सांडपाणी प्रकल्प ( एस टी पी प्रकल्प ) याचे कामही जवळपास ८० % झाल्याचे चित्र दिसून येत आहे . त्यामुळे राहुरी शहरासह तालुक्यातील काही शासकीय विभागांचे कार्यालय व काही शासकिय प्रकल्प त्यांची कामे चर्चेत आली आहे . असे असताना ग्रामीण रुग्णालयाचे काम , जलतरण तलाव , जॉगिंग ट्रॅक नंबर दोन , ही कामे सध्या सुरू आहेत.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### श्रद्धा वाळुंज बुद्धीबळ स्पर्धेत जिल्हास्तरावर निवड



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील श्रद्धा वाळुंज हिची जिल्हास्तर बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा कार्यालय अहिल्यानगर व श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रीगोंदा तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत देवदैठण येथील खेळाडू श्रद्धा अजय वाळुंज हिने १७ वर्ष वयोगटात तृतीय क्रमांक पटकावला. यामुळे तिची जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. श्रद्धाला क्रीडाशिक्षक संदीप घावटे , अमोल कातोरे यांचे म ार्गदर्शन लाभलेआहे. या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम ,शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार ,मुख्याध्यापक पी .जे . मेरगळ , पर्यवेक्षक एन .एस . डुंबरे , संजय देशपांडे , के .बी .काळे व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### आदिवासी व दुर्गम भागात वकृत्व स्पर्धेचे आयोजन पै. हर्षवर्धन सदगीर



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय कोभांळणे या ठिकाणी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त संस्था अंतर्गत वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कोंभाळणे ,पिंपरकणे व टहाकारी या विद्यालयांनी स्पर्धे त सहभाग घेतला. स्पर्धेसाठी विषय कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मेरा भारत महान, पर्यावरण संरक्षण काळाची गरज हे विषय ठेवण्यात आले होते. इयत्ता ५ वी ते ७ वी, इयत्ता ८ वी ते १० वी व ११ वी ते १२ वी या गटांमधून एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमधून इयत्ता दहावीचे विद्यार्थी अनुज बाबासाहेब एखंडे व प्रतीक्षा नामदेव सदगीर यांनी प्रथम क्रम ांकाचे पारितोषिक मिळवले. परीक्षक म्हणून मराठी विषयाचे तज्ञ अध्यापक जितेंद्र खैरनार सर व जाधव सर यांनी काम पाहिले. या स्पर्धांच्या उद्घाटनासाठी डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांची विशेष उपस्थिती होती कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन आरोटे होते. शेवटी पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पद्मश्री राईबाई पोपेरे, संस्थेचे अध्यक्ष प्रा. बबनराव महाले, सेक्रेटरी प्रा. केशवराव नाईकवाडी, मुख्याध्यापक गोरक्ष वाकचौरे , किसन काळे, संजय कडलग, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन भास्करराव कानवडे, रवींद्र तोरमल ,राजेंद्र भोर ,सुभाष काळे, दिपाली डगळे ,गणेश पवार, प्रियंका भांगरे तसेच संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### १.८६ लाख कोटींच्या 'ग्रीन एनर्जी कॉरिडोअर-३' योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**१३५ गिगावॉट अक्षय ऊर्जेसाठी ग्रीड भक्कम होणार**

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारतातील बिगर-जीवाश्म उर्जा क्षमतेचा झपाट्याने विस्तार करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी एक अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. देशातील हरित ऊर्जा टप्प्याटप्प्याने ग्रीडला जोडण्यासाठी आणि १३५ गिगावॉट (GW) अक्षय ऊर्जा वाहून नेण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने १,८६,४०५ कोटी रुपयांच्या 'ग्रीन एनर्जी कॉरिडोअर टप्पा-३' योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेची माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव (हिुळपळ तरळीहपरीं) यांनी सांगितले की, नवीन अक्षय ऊर्जा प्रकल्पांच्या आधीच वीज वहन (ट्रान्समिशन) क्षमता तयार असणे आवश्यक आहे, जेणेकरून विजेचा अपव्यय टळेल आणि राष्ट्रीय ग्रीड मजबूत राहील. २०३२-३३ पर्यंत पूर्ण होणार उद्दिष्ट; ५० हजार कोटी बॅटरी स्टोरेजसाठी-ही संपूर्ण योजना वित्तीय वर्ष २०३२-३३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. योजनेच्या एकूण १.८६ लाख कोटी रुपयांच्या खर्चापैकी १,३६,३७८ कोटी रुपये हे राज्यांतर्गत वीज वहन यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी वापरले जातील. तर उर्वरित ५०,००० कोटी रुपये हे ५० ऋथ्रह क्षमतेची 'बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम' (BESS) उभारण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. केंद्र सरकार या प्रकल्पासाठी तब्बल ५४,०८२ कोटी रुपयांचे आर्थिक साहाय्य देणार आहे.

सौर अन् पवन ऊर्जेतील चढ-उतारांवर मिळणार मातसौर आणि पवन ऊर्जेचे उत्पादन हे हवामानावर आधारित असल्यामुळे वीज पुरवठ्यात वारंवार होणारे बदल आणि ट्रान्समिशनमधील अडचणी दूर करण्यासाठी बॅटरी स्टोरेज सिस्टीम अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या बॅटरी सिस्टीममुळे ज्या वेळी सूर्यप्रकाश नसेल किंवा रात्रीच्या वेळी विजेची मागणी जास्त असेल, तेव्हाही अखंड वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे. देशात ३० जून २०२६ पर्यंत सौर ऊर्जा क्षमता १६२.१५ गिगावॉटवर पोहोचली असून, २०३० पर्यंत ५०० गिगावॅट आणि २०३५ पर्यंत ९०० गिगावॅट नॉन-फॉसिल ऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींनी उपाययोजना कराव्यात

**पंचायत समितीच्या आढावा बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या सूचना; अपूर्ण घरकुले तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने आगामी काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावातील पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ कराव्यात, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिल्या.

पंचायत समिती, श्रीगोंदा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी प्रकल्प संचालक मंजुषा ठवकर उपस्थित होत्या. बैठकीत तालुक्यातील विविध विकासकामे, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच ग्रामपंचायत स्तरावरील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी अपूर्ण असलेली घरकुले तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत यंत्रणेला दिल्या. लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करून कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

तालुक्यात सध्या पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने भविष्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायत अधिकारी यांनी आपल्या गावातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीस्रोत आणि संभाव्य टंचाईचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

याशिवाय 'आपले सरकार' सेवा केंद्र, ग्राम पंचायत वसुली, एम.एस.आर.एल.एम. तसेच 'सेवा संकल्प अभियान' यासह विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. संबंधित योजनांची प्रभावी अंम लबजावणी करण्याबाबत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीस गटविकास अधिकारी राणी फराटे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रतीक काळेवाघ, पंचायत समिती स्तरावरील सर्व कार्यालय प्रमुख, विस्तार अधिकारी तसेच तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी युवक महोत्सव गरजेचा : मा. शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात

संगमनेर (समर्थ गांवकरी)

युवकांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा युवक महोत्सवची गरज आहे. आजचा युवक हा केवळ नोकरी मागणारा न राहता त्याच्याम ध्ये असणाऱ्या कलागुणांच्या माध्यमातून यशाच्या शिखरावर पोहोचू शकतो, त्यासाठी युवक महोत्सव हे एक चांगले माध्यम आहे. आजचा युवक हा देशाच्या परिवर्तनाचा केंद्रबिंदू असून, त्याने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता त्याच्यामधे असणाऱ्या कलांच्या माध्यमातून आपला विकास करण्याचा प्रयत्न करावा आजच्या या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ बक्षीसाचा विचार न करता विविध कला प्रकारांचा आनंद घ्यावा असे मत माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवक महोत्सव 'जल्लोष २०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. सविता कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. संदीप पालवे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, स.ब. वि.प्र.समाज संस्थेचे संचालक, प्रा. बाबा खरात, जिल्हा समन्वयक डॉ. प्रताप फलफले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. जयराम डेरे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. लक्ष्मण घायवट, सांस्कृतिक समन्वयक प्रा. नानासाहेब गुंजाळ, महाविद्यालय प्रशासन अधिकारी, श्री. गोरक्षनाथ पानसरे आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना डॉ. पालवे म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नेहमीच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देते. जल्लोष सारख्या महोत्सवातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपली कला सिद्ध करण्याची संधी मिळत असते. या उपक्रम ाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध २८ कलाप्रकार साध्य करण्यासाठी ही चांगली संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषद ठाणे येथे रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान; अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानात सहभागी होण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचे आवाहन**

ठाणे (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' तसेच १ ऑक्टोबर रोजी साजरा होणाऱ्या जागतिक रक्तदान दिनानिमित्त आज, दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते भगवान धन्वंतरि यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करून रक्तदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध लोकाभिमुख व सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, रक्तदान शिबिर हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग असल्याचे



त्यांनी नमूद केले. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदानासारख्या उपक्रम ांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले. जिल्हा परिषदेमधील अधिकाधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते भगवान धन्वंतरि यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करून रक्तदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. 'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि नागरिकसेवा यांना प्राधान्य देत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## सर्व शाखीय सोनार समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा संगमनेर येथे

राहुरी (समर्थ गांवकरी)

सर्व शाखीय सोनार समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अमृता लॉन्स, घुलेवाडी फाटा, संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन श्री क्षेत्र आळंदी येथील रामायणाचार्य ह.भ.प. साध्वी वैष्णवी दीदी सरस्वती, संगमनेरच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, संगमनेर येथील प्रसिद्ध सराफ दत्तात्रय मैड यांच्या हस्ते होणार आहे.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सुवर्ण नागरी सहकारी पतसंस्था, संगम नेरचे चेअरमन विजयकुमार डहाळे भूषविणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून नाशिकचे पुरवठा निरीक्षक डॉ. वेदांत राजेंद्र कपोते उपस्थित




राहणार आहेत.

सदर मेळाव्याचा लाभ सुवर्णकार समाजातील इच्छुक वधू-वरांनी घ्यावा, असे आवाहन श्रीमती म ीनाताई सोनार, सौ. अनिता शहाणे, श्रीमती गीताताई नवसे, सुरेखाताई लोळगे, स्वातीताई मुंडलिक, सौ. माधुरीताई माळवे, सौ. जयाताई कुलथे, सौ. अनिताताई दारवेकर, भगवान शहाणे, गोपाळ कुलथे, संदीप उदावंत, श्रीकांत जोजारे, पवनराव कुलथे, रवी माळवे, संग्राम मयूर, राजेंद्र कुलथे, मनोज पळसकर, योगेश शहाणे आदींनी केले आहे.

## श्रीगोंदा-नगर तालुक्यातील पाणीप्रश्नासाठी आ. पाचपुते यांचा पाठपुरावा

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

**दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी मंत्रालयात चर्चा; बंद पाणीपुरवठा सुरू करण्यासह तलावांमध्ये पाणी सोडण्याबाबत मागणी**

श्रीगोंदा व नगर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूम ीवर नागरिक, शेतकरी व पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूम ीवर श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मंत्रालयातील दालनात भेट घेऊन तालुक्यातील पाणीप्रश्नाबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी श्रीगोंदा व नगर तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईकडे आमदार पाचपुते यांनी मंत्री विखे पाटील यांचे लक्ष वेधले. बंद करण्यात आलेला पाणीपुरवठा पुन्हा सुरू करणे, विसापूर तलावासह तालुक्यातील अन्य तलावांमध्ये आवश्यकतेनुसार पाणी सोडण्यासाठी उपाययोजना करणे, तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचे शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याच्या गरजा लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्याची मागणी त्यांनी केली.

सध्याच्या परिस्थितीत पाण्याची उपलब्धता आणि मागणी यामध्ये मोठी तफावत निर्माण होत असल्याने ग्राम ीण भागातील नागरिकांसह शेतकरी व पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून टंचाईग्रस्त भागांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आमदार पाचपुते यांनी व्यक्त केली.

यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित यंत्रणांशी चर्चा करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे



श्रीगोंदा व नगर तालुक्यातील पाणीप्रश्नावर लवकरच सकारात्मक कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, ग्राम स्थ आणि पशुधनाला पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी आमदार विक्रमदादा पाचपुते यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून, तालुक्यातील पाणीप्रश्न तातडीने मार्गी लागावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# सखाराम तळपाडे यांच्याकडून युपिएससी पुस्तकांचा संच भेट

## प्रियांकाच्या पंखांना मिळालं अभ्यासाच बळ!

राजूर (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्ता, जिद्द आणि मोठी स्वप्ने असतात. मात्र त्या स्वप्नांना योग्य दिशा, मार्गदर्शन आणि आधार मिळणे तितकेच महत्त्वाचे असते. याच भावनेतून राजूर येथे एक प्रेरणादायी उपक्रम घडला.

ड्. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर या महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रियंका तांबेकर णझडउ परीक्षेची तयारी करत आहे. काही दिवसांपूर्वी मवेशी येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सखाराम सोमा तळपाडे, ग्रामपंचायत अधिकारी यांनी प्रियंकाच्या णझडउच्या तयारीबद्दल जाणून घेतले. तिची जिद्द आणि अभ्यासाची तयारी पाहून त्यांनी तिला आवश्यक पुस्तके देण्याचा शब्द दिला होता.

आज त्यांनी दिलेला तो शब्द प्रत्यक्षात उतरवला. प्रियंकाला णझडउ झीश. चा संच भेट देऊन तिच्या अभ्यासाला मोलाची साथ दिली.

मात्र तळपाडे साहेबांची मदत केवळ या पुस्तकांपुरती मर्यादित नाही. प्रियंकाला स्पर्धा परीक्षेतून Class 1 पद मिळेपर्यंत अभ्यासासाठी जी काही पुस्तके आवश्यक असतील, ती सर्व पुस्तके देण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. त्यामुळे प्रियंकाच्या पंखांना खऱ्या अर्थाने बळ मिळाले आहे.

ही केवळ पुस्तकांची भेट नाही; तर एका विद्यार्थिनीच्या स्वप्नावर ठेवलेला विश्वास, तिच्या मेहनतीला दिलेली साथ आणि तिच्या भविष्यासाठी घेतलेली सामाजिक जबाबदारी आहे.

ग्रामीण भागातील अनेक मुलांमध्ये प्रचंड क्षमता असते. योग्य मार्गदर्शन मिळाले, योग्य दिशा मिळाली आणि समाजातील एखादा मदतीचा हात पुढे आला, तर हीच मुले मोठी स्वप्ने प्रत्यक्षात उतरवू शकतात. तळपाडे साहेबांनी प्रियंकाला दिलेली साथ हा त्याच विश्वासाचा सुंदर नमुना आहे.

तुझ्या स्वप्नांच्या प्रवासात मी तुझ्यासोबत आहे, हा विश्वास विद्यार्थ्याला मिळणे हीच त्याच्यासाठी मोठी प्रेरणा असते.

ग्रामीण भागातील बुद्धिमत्तेला योग्य मार्गदर्शन,





दिशा आणि आधार देण्याची गरज आजच्या काळात मोठी आहे. अशाच प्रकारे मदतीचे हात पुढे आले, तर ग्रामीण भागातील अनेक प्रियंकांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळू शकते.

एका विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक देणे म्हणजे केवळ ज्ञान देणे नाही; तर त्याच्या हातात भविष्याची एक नवी शक्यता देणे होय.

या प्रेरणादायी उपक्रमात पर्यावरणप्रेमी राहुल राऊत हे देखील सहभागी झाले होते. पर्यावरण संवर्धनासोबतच शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आधार देणाऱ्या सकारात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होणे, हीदेखील समाजाप्रती आपली जबाबदारी आहे, या भावनेतून या उपक्रमात सहभाग नोंदविण्यात आला.

या प्रेरणादायी क्षणाला प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख, शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब दोरगे, कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो. प्रा.डॉ. भरत शेणकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख प्रा.डॉ. व्ही.एन. गिते,एन.सी.सी. प्रमुख प्रा. रोहित मुठे, प्रा. डॉ. रेखा कढणे,प्रा. अनिल आवारी, न्यू इंग्लिश स्कूल, रुंभोडीचे संस्थापक अध्यक्ष शांताराम मालुंजकर, चौधरी सर आणि प्रा. प्रतीक भांगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रियंकाच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या या सुंदर आणि प्रेरणादायी उपक्रमाला मनापासून सलाम!

अशा मदतीचे हात पुढे येत राहोत आणि ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने उंच भरारी घेत राहोत अशी अपेक्षा व्यक्त होत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची शहापूर तालुक्यातील 'स्वप्नातील गाव' उपक्रमांतर्गत गावांना भेट

## गाव विकास समित्यांच्या कामाची पाहणी; स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर, समृद्ध व सृष्टी या सहा घटकांवर सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

सेवा संकल्प अभियान अंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी शहापूर तालुक्यातील भोसपाडा, देवगाव व कोठारे या गावांना भेट देऊन स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून 'स्वप्नातील गाव' संकल्पनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या गाव विकास समित्यांच्या कामाची पाहणी केली. यावेळी गाव विकास समित्यांचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील अधिकारी यांच्याशी संवाद साधून गावाच्या विकासाचा आढावा घेण्यात आला.

या दौऱ्यादरम्यान एकलव्य गाव विकास समिती, भोसपाडा – ग्रामपंचायत टेंभा; गावदेवी गाव विकास समिती, देवगाव – ग्राम पंचायत साकडबाव; तसेच सावित्रीबाई फुले गाव विकास समिती, कोठारे – ग्रामपंचायत कोठारे यांच्या पदाधिकारी व सदस्यांशी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी संवाद साधला.

यावेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर बाबुराव राठोड, स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार व प्रसाद पाटील, महाव्यवस्थापक अविनाश कमाने, ठाणे-पालघर जिल्हा व्यवस्थापक रविंद्र राऊत, ग्रामपंचायत अधिकारी पावसे व ठाकरे, संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, गाव विकास समितीचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वृक्षारोपणाने दौऱ्याची सुरुवात**

दौऱ्याची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत वृक्षलागवड करण्यात आली. त्यानंतर त्यांनी गावातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

भोसपाडा येथे जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अनुभव, शाळेतील सुविधा तसेच शिक्षणाशी संबंधित बाबी जाणून घेतल्या. तसेच गावातील घरकुलाची पाहणी करून लाभार्थ्यांशी संवाद साधला. लाभार्थ्यांच्या घरी जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' लावण्यात आला.

**'स्वप्नातील गाव' संकल्पनेच्या प्रवासाची माहिती**

स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून गावपातळीवर 'स्वप्नातील गाव' ही संकल्पना कशा पद्धतीने रुजविण्यात आली, आतापर्यंत या संकल्पनेचा प्रवास कसा झाला, गाव विकास समित्यांची भूमिका काय आहे तसेच गावाच्या विकासासाठी काम करताना कोणत्या अडचणी येतात, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या पदाधिकारी व सदस्यांकडून माहिती घेतली.

'स्वप्नातील गाव' संकल्पनेअंतर्गत गावाच्या विकासासाठी स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर, समृद्ध आणि सृष्टी या सहा घटकांवर भर देण्यात येत आहे. या सहा घटकांच्या अनुषंगाने ग्रामस्थ व गाव विकास समितीने गावात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी जाणून घेण्यात आली.

गावाचा विकास आराखडा तयार करताना ग्रामस्थांचा सहभाग कसा घेतला जातो, गावाचा नकाशा कशा पद्धतीने तयार करण्यात आला आहे आणि त्या नकाशामध्ये गावातील कोणकोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे, याचीही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली.

**गावातील मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी**

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी गावातील शासकीय यंत्रणांशी संबंधित प्रलंबित कामे तसेच मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये शोषखड्डे, समाजमंदिर, रस्ते, दफनभूमी, सोलर पथदिवे, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा आणि घरकुले यांचा समावेश होता.

देवगाव येथे गावदेवी विकास समितीच्या पदाधिकारी व ग्रामस्थांकडून स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून गावात झालेल्या परिवर्तनाची माहिती घेण्यात आली. गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांची तसेच स्वच्छता व्यवस्थेची माहिती जाणून घेतली. ओला व सुका कचरा वेगळा करणे, गावातील स्वच्छता व्यवस्था आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या शोषखड्ड्यांमुळे गावात झालेला बदल याबाबत ग्रामस्थांशी चर्चा करण्यात आली.

**उपजीविका निर्मिती आणि महिला बचत गटांच्या सक्षमीकरणावर भर**

गावाच्या सर्वांगीण विकासासोबतच ग्रामस्थांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपजीविकेची साधने निर्माण करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. महिला बचत गटांच्या माध्यमातून गृहउद्योग तसेच शेतीच्या उत्पन्नावर आधारित विविध व्यवसाय उभारण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच उत्पादित मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ व विक्री व्यवस्था निर्माण करणे याबाबतही चर्चा करण्यात आली. महिला बचत गटांना केवळ बचतीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना उत्पन्ननिर्मितीच्या उपक्रमांशी जोडण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**शिक्षण, आरोग्य व उपजीविकेला प्राधान्य**

गावाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका हे महत्त्वाचे घटक असून, या क्षेत्रांत ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले. गावातील उपलब्ध शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायत, गाव विकास समिती आणि सामाजिक संस्थांनी परस्पर समन्वयातून काम केल्यास विकासकामांना अधिक गती मिळू शकते, यावरही त्यांनी भर दिला.

गाव विकास समिती, शासन आणि स्वदेस फाऊंडेशन यांनी एकत्रितपणे नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास गावाच्या सर्वांगीण विकासाचा एक आदर्श निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.



**गाव विकास आराखड्यानुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना**

गावातील विविध समस्या व प्रलंबित विकासकामांबाबत ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर संबंधित कामांचे प्रस्ताव तयार करून ते ग्राम पंचायतीमार्फत संबंधित शासकीय यंत्रणेकडे सादर करून त्याचा पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गावातील शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, उपजीविका, महिला सक्षमीकरण तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित बाबींवर ग्रामस्थांकडून माहिती घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी दिशा निश्चित करण्यात आली.

या भेटीमुळे गावातील प्रलंबित समस्या थेट प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यास मदत झाली. तसेच गाव विकास समित्यांच्या माध्यमातून ग्रामस्थांचा सहभाग वाढवून 'स्वप्नातील गाव' संकल्पनेच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी पुढील दिशा निश्चित झाली.

**पुढील दोन वर्षांत गाव स्वप्नातील गाव बनविण्याचा संकल्प**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह निर्माण झाला असून, गाव विकास समिती आणि ग्रामस्थ अधिक जोमाने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढील दोन वर्षांत आपले गाव 'स्वप्नातील गाव' बनविण्याचा ठाम विश्वास व संकल्प ग्रामस्थांनी व्यक्त केला.

ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, गाव विकास समित्यांचे नियोजनबद्ध काम, ग्रामपंचायतीचा समन्वय आणि स्वदेस फाऊंडेशन तसेच शासकीय यंत्रणांचे सहकार्य यांच्या माध्यमातून गावांच्या विकासाला अधिक गती मिळण्यास या भेटीमुळे निश्चितच चालना मिळाली.

# श्री कोरठण खंडोबा मंदिरावरील सुवर्ण कळसाला तडा गेलेला नाही,कळसाला पंचधातूंचा संयोग !

- ३० वर्षांपूर्वी कळस शिखर बांधकाम केलेल्या कारागिराकडून निर्वाळा !
- विश्वस्तांकडून पत्रकाद्वारे माहिती !





**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

लाखो भाविक भक्तांचे कुलदैवत आणि श्रद्धास्थान राज्यस्तरीय ब वर्ग तीर्थक्षेत्र असलेले श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान, पिंपळगाव रोठा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर या मंदिराच्या मुख्य कळसावर सोमवार दि. २१ सप्टेंबर रात्री विज कोसळून कळसाला तडा गेल्याची व इतर नुकसान झाल्याची बातमी, फोटो प्रसार माध्यमातून आल्यावर,लाखो भाविक भक्तांच्या श्रद्धा, भावनांना, तसेच देणगीदार, ग्रामस्थ व कळस बांधकामाचे कारागीर यांना मोठा धक्का बसला होता. त्याबाबत शेकडो भाविक भक्तांकडून विचारणा होत होती.

देवस्थानच्या आजवरच्या इतिहासात ही पहिलीच घटना असल्याने ग्रामस्थ. भाविक भक्त यांच्याकडून सांगितले जात आहे. सुवर्ण कळसासाठी आणि कळस शिखर बांधकामासाठी लाखो भाविक भक्त, देणगीदार यांनी योगदान व दान दिलेले आहे.विश्वस्तानी तडा गेल्याचे खण्डन केले आहे व तसे प्रसिद्धी पत्रक काढले आहे.

देवस्थान विश्वस्तांकडून विनंती केल्यानुसार, मंदिराचे सुवर्ण कळसाला तडा गेल्याची पाहणी करणेसाठी ३० वर्षापूर्वी मंदिर कळस शिखराचे नविन बांधकाम करणारे कारागिरांपैकी श्री राजू ज्ञानेश्वर जाधव रा.आळे,ता.जुन्नर यांनी रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी देवस्थानला भेट देऊन मंदिरावरील मुख्य सुवर्ण कळसाचे निरीक्षण केले. आणि सुवर्ण कळसाला तडा गेलेला नसल्याचा निर्वाळाही त्यांनी दिला. सन १९९३-९४ ते सन १९९७ पर्यंत आपले वडील कै.ज्ञानेश्वर रघुनाथ जाधव (माऊली) आणि आपण स्वतः मंदिराचे नविन कळस शिखराचे बांधकाम केले आहे.

ग्रामस्थांनी श्रमदान करून घाणी बनवून चुना मळून दिल्यावर कळस बांधकामावर रापलेला चुना मध्ये घोटई व नक्षीकाम करण्यात आलेले आहे.

# महात्मा गांधी जयंती निमित्त जयहिंदच्या वतीने २ ऑक्टो रोजी संगमनेर मध्ये विविध कार्यक्रम

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण जगाला सत्य व अहिंसेचा मंत्र देणारे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंती निमित्ताने जयहिंद लोकचळवळीच्या वतीने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये संगमनेर मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, गांधीं भजन हे कार्यक्रम होणार असून दुपारी ४ वाजता जवाहरलाल हाजीर हो या पुस्तकाचे प्रकाशन असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आ.डॉ. सुधीर तांबे यांनी दिली आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जयहिंद लोक चळवळीच्या वतीने आयोजित विविध कार्यक्रमांची माहिती देताना संस्थापक माजी आमदार डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी संपूर्ण जगाला मानवतेचा आणि शांततेचा संदेश देताना सत्य व अहिंसा हे मूलमंत्र दिले आहेत. त्यांच्याच विचारांची जगाला आज गरज असून त्यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त संगमनेर मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ७.३० वाजता यशोधन कार्यालय येथील मैदानापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी निघणार आहे. यानंतर संगमनेर बस स्थानक येथे सकाळी ८.३० महात्मा गांधीजी यांचे आवडते भजने सादर केली जाणार आहेत. याचबरोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची भव्य रांगोळीतून प्रतिमा साकारली जाणार आहे. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तर दुपारी ४ वाजता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयातील के.बी.दादा सभागृह येथे पंकज चतुर्वेदी लिखित आणि राहुल कोसंबी अनुवादित जवाहरलाल हाजीर हो या पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे मा.महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे व वक्ते संजय आवटे हे उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ.राहुल कोसंबी, श्रीमती प्रमिला माया नारायण, गणेश घुले यांच्यासह आमदार सत्यजित तांबे,सौ. दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ. सौ.मैथिलीताई तांबे व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावेळी संजय आवटे यांचे व्याख्यान होणार आहे.

- महात्मा गांधीजींची वेशभूषा करून १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी
- तर दुपारी जवाहरलाल हाजीर हो पुस्तक प्रकाशन सोहळा



तरी सकाळी होणारी प्रभात फेरी, संगमनेर बस स्थानकावर होणारे गांधी भजने, व के.बी.दादा सभागृहातील पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी संगमनेर मधील सर्व नागरिक महिला युवक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जयहिंद लोकचळवळीच्या वतीने करण्यात आले आहे.

# महानुभाव साहित्याच्या समृद्ध परंपरेवर नवी दिल्लीत राष्ट्रीय चर्चासत्र महानुभाव साहित्याचे महाराष्ट्र संस्कृतीच्या जडणघडणीतील योगदान अधोरेखित

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर (अमरावती) आणि अखिल भारतीय महानुभाव परिषद, अमरावती यांच्या समन्वयाने तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने महाराष्ट्र सदन येथे आयोजित महानुभाव साहित्याच्या समृद्ध परंपरेवर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात या साहित्याच्या महाराष्ट्र संस्कृतीच्या जडणघडणीतील योगदानाचा गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र सदनात यानिमित्ताने आयोजित महानुभाव साहित्याच्या विशेष ग्रंथप्रदर्शनाचे व चर्चासत्राचे उद्घाटन भारतीय भाषा समितीचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. चमू शास्त्री यांच्या हस्ते झाले. मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर अध्यक्षस्थानी होते. तर महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, बाबासाहेब बिडकर, प्रमुख समन्वयक हरिहर पांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रदर्शनात महानुभाव साहित्य परंपरेशी संबंधित दुर्मिळ, प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ मांडण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनातून महानुभाव साहित्याची समृद्ध परंपरा, वैचारिक वारसा तसेच मराठी भाषेच्या विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाचा परिचय करून देण्यात आला.

चर्चासत्राच्या प्रथम सत्रात 'अभिजात महानुभाव साहित्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये' या विषयावर सखोल विचारमंथन झाले. या सत्राचे अध्यक्षस्थान महानुभाव साहित्य व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. बाबासाहेब बिडकर यांनी भूषविले, तर सूत्रसंचालन डॉ. किरण वाघमारे यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासनाचे प्रमुख महंत डॉ. सोनपेठकर बाबा, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूरचे अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाचे डॉ. हंसराज जाधव आणि नागपूर विद्यापीठातील श्रीचक्रधर स्वामी अध्यासनाचे प्रमुख डॉ. भारतभूषण शास्त्री यांनी सहभाग घेतला. या सत्रात महानुभाव साहित्याची प्राचीनता, त्यातील व्याकरणशुद्धता, भाषिक वैशिष्ट्ये आणि मराठी भाषेच्या विकासातील योगदान यावर विविधांगी चर्चा करण्यात आली.

द्वितीय सत्रात 'महानुभाव साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान' या विषयावर विचारमंथन झाले. या सत्राचे अध्यक्षस्थान उपाध्यक्ष कुलाचार्य प.प. महंत श्रीवर्धनस्थ बिडकरबाबा (रणाईचे) यांनी भूषविले, तर सूत्रसंचालन अश्विनी पंजाबी यांनी केले. म. श्री गोपीराजबाबा शास्त्री, म. सैंगराजदादा सातारकर, म. श्री सारंगधरबाबा पंजाबी आणि म. श्री नितीनदादा बांधकर यांनी सहभाग घेत महानुभाव साहित्याने तत्कालीन समाजजीवनाला दिलेली दिशा, सामाजिक मूल्यांची जपणूक आणि सांस्कृतिक परंपरांच्या संवर्धनातील योगदान यावर विचार मांडले.



तृतीय सत्रात 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. या सत्राचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल यांनी भूषविले. डॉ. कीर्ती कुलकर्णी, श्री. अजित चव्हाण, श्री. दीपक पाटील आणि सौ. पौर्णिमा पंडित यांनी या सत्रात सहभाग घेतला. महानुभाव पंथाने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक जडणघडणीत बजावलेल्या ऐतिहासिक भूमिकेवर यावेळी चर्चा करण्यात आली. बाराव्या शतकात उदयास आलेल्या या पंथाने लोकभाषेचा पुरस्कार करून मराठी गद्याच्या विकासाला चालना दिली. 'लीळाचरित्र' या आद्य चरित्रग्रंथासह विविध ग्रंथांच्या माध्यमातून अहिंसा, समता आणि मानवतावादी मूल्यांच्या प्रसारात महानुभाव साहित्याने महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.श्री. अजित चव्हाण यांनी सुत्रसंचालन केले.

महानुभाव साहित्याची अभिजात परंपरा, त्याचे भाषिक व साहित्यिक वैशिष्ट्य,सामाजिक-सांस्कृतिक योगदान आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ऐतिहासिक भूमिका या विविध पैलूंवर या राष्ट्रीय चर्चासत्राच्या माध्यमातून सखोल विचारमंथन झाले. दिल्ली परिसरातील अभ्यासक, संशोधक, भाविक मोठ्या संख्येने या चर्चासत्रास उपस्थित होते.

# कर्जत तालुक्यात दुष्काळी उपाययोजना त्वरित लागू कराव्यात : सचिन सटाले

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा 'जन आंदोलनाचा' इशारा !

**कर्जत (समर्थ गांवकरी)**



कर्जत तालुक्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती असताना सरकार नुसत्या घोषणा करत आहे.केवळ दुष्काळाची घोषणा न करता राज्य सरकारने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पावसाअभावी वाया गेलेल्या पिकांची पाहणी करून सरसकट नुकसान भरपाई देवुन दुष्काळी उपाय योजना त्वरित लागू कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कर्जत तालुकाध्यक्ष सचिन हनुमंतराव सटाले यांनी केली आहे.

तर पत्रकारांशी बोलताना सटाले म्हणाले, तालुक्यात बेरोजगार तरुणाईची संख्या वाढत असून बहुचर्चित असलेल्या प्रश्न एमआयडीसी तसेच सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याचा तुकाई चारी प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने त्या प्रश्नांबाबत वेळोवेळी निवडणुका कालावधीमध्ये नुसते लोकप्रतिनिधी भांडवल करून घेतात. त्यानंतर हा प्रश्न जैसे थे ठेवला जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून येथील जनतेला दोन्हीही लोकप्रतिनिधी झुलवत ठेवण्याचे काम केले आहे. मतदारसंघातील मुलभूत प्रश्नांचा विसर देखील त्यांना पडला की काय? असा प्रश्न यावेळी त्यांनी उपस्थित केला. तर सध्या तालुक्यात एकमेकांवर चिखल फेक करण्यात नेते मंडळी व्यस्त असल्याने ज्वलंत परिस्थितीवर कोणीही भाष्य करण्यास तयार नाही. तर दुसरीकडे प्रशासकीय स्तरावर सुरू असलेल्या निवडणूक प्रमुखांच्या घोळ आणि जनतेच्या प्रश्नाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे सत्ताधारी भाजपा महायुती सरकार विरुद्ध जनसामान्यात संतप्ताची लाट निर्माण झाली आहे.

यंदा पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामात अपुऱ्या आणि अनिश्चित पावसामुळे पिके करपून अधिकचे नुकसान झाले, असताना बळीराजा पूर्णतः उध्वस्त झाला असल्याने पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मोठा गंभीर बनला आहे. दिवसेंदिवस परिस्थिती उग्ररूप धारण करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. खरीप हंगामाबरोबरच रब्बी हंगामावर ही संकट वढाविलेले असून पावसाअभावी खरीप पिके हातातून जाण्याची भीती असताना आता रब्बी हंगामाची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.